cmyk

## संपादकीय

### युनूस यांची भुमिका चिंता वाढविणारी

बांगलादेशमध्ये शेख हसीना सरकार कोसळल्यानंतर तेथील सरकार भारतविरोधी वक्तव्ये सातत्याने करत आहे. नुकतेच तेथील हंगामी नेते मोहम्मद युनूस यांनी सिलीगुडी कॉरिडॉरबाबत एक वक्तव्य केले असून या विधानामुळे बांगलादेश चीनसोबत मिळून काही तरी कारस्थान रचत आहे का, याविषयी शंका वाढली आहे. हा कॉरिडॉर सुमारे २२ किलोमीटर रुंदीचा आहे. याद्वारे भारताची ईशान्येकडील राज्ये मुख्य भूप्रदेशाशी जोडलेले आहेत. त्याच्या सीमेला नेपाळ, भूतान आणि बांगलादेश लागून आहेत, तर उत्तरेला चीनशी जोडलेला तिबेट प्रांत आहे.


दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### भाजपचा वर्धापन दिन तारखेप्रमाणे की सोयीप्रमाणे?–उद्धव ठाकरे

मुंबई : भाजपच्या स्थापना दिनावर उद्धव ठाकरेंनी खोचक शुभेच्छा दिल्या आहेत. प्रभू राम जसे वागले तसं वागण्याचा प्रयत्न करा असे ठाकरेंनी म्हटले आहे. तसेच भाजपचा वर्धापन दिन तारखेप्रमाणे की सोयीनुसार असा सवालही ठाकरेंनी विचारला. तसेच योजनांवरुन यूटर्न घेणाऱ्यांकडे रामाचं नाव घेण्याची पात्रता नाही असा हल्लाबोल ठाकरेंनी महायुती सरकारवर केला आहे.


बीड – महाराष्ट्र | वर्ष –४ | अंक–३४२ | सोमवार, दि.०७ एप्रिल २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


# अखेर माणिकराव कोकाटेंचा माफिनामा

## कर्जमाफी वरून शेतकऱ्यांचा केला होता अवमान, सगळ्यांनीच संताप व्यक्त केल्यानंतर आले शहाणपण

**नाशिक । प्रतिनिधी**

**कर्जमाफीच्या मुद्यांवर बोलताना राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी शेतकऱ्यांना अवमानकारक बोल सुनावले होते. त्यानंतर राज्यभरातील शेतकऱ्यांसह राजकीय वर्तुळातून कृषीमंत्र्यांवर टीका होत होती. अखेर कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी शेतकऱ्यांबद्दल केलेल्या वक्तव्यावर दिलगिरी व्यक्त केली आहे. कोकाटे यांनी रविवारी नाशिकच्या काळाराम मंदिरात जाऊन दर्शन घेतले, त्यानंतर ते बोलत होते.**

शेतकऱ्यांच्या भावना दुखावल्या असतील तर मी दिलगिरी व्यक्त करतो. शेतकऱ्यांची अनावधानाने आणि मस्करीत कृती झाल्याने असे वक्तव्य केल्याचे कोकाटे म्हणाले. शेतकऱ्यांचा मान सन्मान दुखावला गेला असेल, भावना दुखावल्या असतील तर मी दिलगिरी व्यक्त करतो असे कोकाटे



दिल्या. चार दिवसांपुर्वी कोकाटे म्हणाले होते की, जे नियमितपणे कर्ज भरतात त्यांनी भरावे. कर्ज घ्यायचे आणि पाच ते दहा वर्ष कर्जमाफी होण्याची वाट पाहायची. तोपर्यंत काही भरायचे नाही असे मामिकराव कोकाटे म्हणाले. तसेच कर्जमाफी झाल्यानंतर तुम्हाला पैसे येतात. त्या पैशांचे तुम्ही काय करता? त्या पैशांतून शेतीमध्ये एक रुपयाची तरी गुंतवणूक आहे का? असा सवाल त्यांनी केला होता. सरकार तुम्हाला शेतीमध्ये गुंतवण्यासाठी पैसे देणार आहे. तुम्हाला पाईपलाईनाला पैसे आहेत. सिंचनासाठी पैसे आहेत. तुम्हाला शेततळ्यासाठी पैसे आहेत. सरकार भांडवली गुंतवणूक करते. भांडवली गुंतवणूक शेतकरी करतात का? शेतकरी म्हणतात की, पीक विम्याचे पैसे पाहिजेत. मग त्यातून साखरपुडे करा, लग्न करा,'' असे वक्तव्य माणिकराव कोकाटे यांनी केले होते. यावर राज्यभरातील शेतकऱ्यांसह राजकीय वर्तुळातून कृषीमंत्र्यांवर टीकेची झोड उठली होती. पान २ वर

## औरंगजेबची कबर असलेल्या खुलताबादचे नामांतर होणार–पालकमंत्री संजय शिरसाट

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

**औरंगजेबची कबर असलेले खुलताबादचे नाव रत्नपूर होते. औरंगजेबने ते बदलून खुलताबाद केले. देवगिरीचे नाव बदलून दौलताबाद केले. खुलताबादचे नामांतर होणार असून दौलताबादचे देखील नामांतर होणार आहे, असे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी माध्यमांशी बोलताना म्हटले.**

शिरसाट म्हणाले, औरंगजेबाने त्याच्या काळात जे काही कारनामे केले आहेत त्यामुळे अनेक शहरांची नावे बदलली. धाराशिवचे नाव बदलले गेले. नगरचे नाव बदलले गेले. हे सगळे 'बाद' 'बाद' आहे ना त्यांची नावे बदलण्याची प्रोसेस आम्ही करत आहोत. औरंगजेबाची कबर हटवावी, अशी मागणी हिंदुत्वावादी संघटनांकडून करण्यात येत आहे. त्यावरून महाराष्ट्रात राजकारण पेटले. नागपूरमध्ये दंगल देखील झाली. यानंतर आता औरंगजेबांची कबर असणाऱ्या तालुक्याचे नाव बदलणार असे त्यांनी म्हटले आहे.

## थोडक्यात...

### शिर्डीत रामनवमीचा उत्साह

शिर्डी–शिर्डीतील तीन दिवसीय रामनवमी उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. काकड आरतीनंतर साईबाबांची प्रतिमा, पोथी आणि विणा मिरवणुकीने उत्सवाला सुरुवात करण्यात आले. साईबाबांनी शिर्डीत सुरू केलेल्या रामनवमी उत्सवाचे ११४ वे वर्ष आहे. रविवारी दिवसभरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. साई मंदिर दर्शनासाठी रात्रभर खुले असणार आहे. लाखो भाविक साई समाधीचे दर्शन घेणार आहे. शिर्डीत रामनवमीचा उत्साह पाहायला मिळत आहे.

### वक्फ सुधारणा विधेयकाला राष्ट्रपतींची मंजुरी

नवि दिल्ली : वक्फ सुधारणा विधेयक संसदेच्या दोन्ही सभागृहांनी मंजूर केल्यानंतर आता कायद्यात रुपांतरित झाले आहे. या विधेयकाला राष्ट्रपतींची मंजुरी मिळाली आहे. लोकसभा, राज्यसभेत वक्फ सुधारणा विधेयक मंजूर झाल्यानंतर राष्ट्रपतींकडे मंजुरीसाठी पाठवण्यात आले आहे. राष्ट्रपतींच्या सहीने हे विधेयक आता कायद्यात रुपांतरित झाले आहे. आता हा कायदा देशभरात लागू झालाय. मात्र काँग्रेस, आप आणि एमआयएमने या नव्या कायद्याला कोर्टात आव्हान दिले आहे.

### ख्रिश्चनांच्या जमिनीवर सरकारचा डोळा–राहुल गांधी

नवी दिल्ली : वक्फ सुधारणा विधेयक आता मुस्लिमांच्या हक्कांवर गदा आणत आहे. आता केंद्र सरकारचा डोळा ख्रिश्चनांच्या जमिनीवर आहे. संविधान ही एकमेव ढाल आहे, जी आपले अशा हल्ल्यांपासून संरक्षण करते. त्यामुळे संविधानाचे रक्षण करणे हे आपले सामूहिक कर्तव्य आहे, राहूल गांधी यांनी असे एक्स पोस्टमधून म्हटले आहे.

### मुलाएवढं प्रेम कार्यकर्त्यांवर करा– नितीन गडकरी

नागपूर : केंद्रीय मंत्री गडकरींचा भाजप नेत्यांना चिमटा घेतला असन नेत्यांचे मुलावर प्रेम, म्हणून ते तिकीट मागतात. मुलाएवढं प्रेम कार्यकर्त्यांवर करा, असा सल्ला देत मी माझ्या मुलांसाठी तिकीट मागत नाही, असेही सांगितले.

### सत्र न्यायालयाने फिर्यादीलाच ठोठावला दंड

ठाणे : ठाण्यातील काशिमीरा पोलिस स्टेशनमध्ये नोंदवलेल्या खंडणी आणि मारहाणीच्या गुन्ह्यात फिर्यादीला ठाणे सत्र न्यायालयाने २५ हजारांचा दंड ठोठावला आहे. पोलीस यंत्रणा आणि न्यायालयाचा वेळ वाया घालवल्याप्रकरणी हा दंड ठोठावण्यात आला आहे. तसेच फिर्यादीला एका आठवड्यात रक्कम जमा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

### ऋचा कुलकर्णी न्यायाधीश परीक्षेत राज्यात प्रथम

बीड : बीडमध्ये पिग्मी एजंट म्हणून काम करणा–या विठ्ठल कुलकर्णी यांची मुलगी ऋचा हिने दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी परीक्षेत यश मिळवले. एवढेच नाही तर ती राज्यात पहिली आली आहे. सन २०२३ मध्ये ही परीक्षा झाली होती त्यानंतर २०२४ मध्ये मुख्य परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला.

## बीड जिल्ह्यातील ६ तर राज्यभरातील १०२५ न्यायाधीशांच्या बदल्या

**बीड । प्रतिनिधी**

**मागील काही दिवसांपासून राज्यात आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे सत्र सुरू असतानाच आता राज्यभरातील न्यायाधीशांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. मुंबई उच्च न्यायालयातून तब्बल १०२५ न्यायाधीशांच्या बदलीचे आदेश जारी करण्यात आले आहेत. यामध्ये बीड जिल्ह्यातील ६ न्यायाधिशांचा समावेश आहे.**

मुंबई हायकोर्टाचे रजिस्ट्रार जनरल समीर आडकर यांनी हे आदेश जारी केले आहेत. राज्यभरातील विविध जिल्हा व सत्र न्यायालयांमध्ये कार्यरत जिल्हा न्यायाधीश, वरिष्ठस्तर व कनिष्ठस्तर दिवाणी न्यायाधीशांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. एकूण १०२५ बदल्यांमध्ये तब्बल २२२ जिल्हा न्यायाधीश आहेत. त्यामध्ये मुंबई, पुणे, नागपूर, बीड, नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद यांसह राज्यातील विविध जिल्हा न्यायालयांमधील न्यायाधीशांचा समावेश आहे. काही न्यायाधीशांना त्याच जिल्ह्यात पोस्टिंग मिळाली आहे.

पुण्यातील दहा जिल्हा न्यायाधीशांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये जे. एल. गांधी, पी. पी. जाधव, बी. पी. क्षीरसागर, ए. एम. बुक्के, आर. के. देशपांडे, एस. बी. राठोड, ए. ए. घनिवळे, एस. आर. नरवडे, एस. एन. सचदेव आणि सरिता पवार यांचा समावेश आहे. दिवाणी वरिष्ठ स्तरातील ३३१ आणि कनिष्ठ स्तरातील ४७२ न्यायाधीशांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. यामध्येही बीड जिल्ह्यातील पान २ वर

> **बीड जिल्ह्यातील या सहा न्यायाधिशांच्या झाल्या बदल्या**
>
> बदलीमध्ये बीडमधील ६ जिल्हा न्यायाधीशांचा समावेश आहे. बीड कोर्टातील एस. आर. पाटील, के. आर. जोगळेकर, अंबाजोगाई न्यायालयातील डी. डी. खोचे, एस. जे. घरत, केज न्यायालयातील के. डी. जाधव आणि माजलगाव न्यायालयातील बी. जी. धर्माधिकारी या न्यायाधीशांचा यात समावेश आहे.

## शेतकरी नेते दल्लेवाल यांचे १३१ दिवसांनंतर उपोषण मागे



**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

२६ नोव्हेंबर २०२४ पासून सलग १३१ दिवस बेमुदत उपोषणाला बसलेले शेतकरी नेते जगजित सिंग दल्लेवाल यांनी रविवारी उपोषण मागे घेतले. शेतमालाला किमान आधारभूत किंमत मिळावी यासह आंदोलक शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांसाठी त्यांनी हे उपोषण पुकारले होते. फतेहगड साहिब डिस्ट्रीक येथील श्रीहिंद येथे पान २ वर

## पंतप्रधान मोदींच्या हस्ते देशातील पहिल्या व्हर्टिकल लिफ्ट सागरी पुलाचे उद्घाटन



**रामेश्वरम । वृत्तसंस्था**

**पंतप्रधान मोदींनी समुद्रात उभारलेल्या देशातील पहिल्या व्हर्टिकल लिफ्ट पूलाचे उद्घाटन केले. हा पूल तामिळनाडूतील रामेश्वरम येथे आहे. नवीन पंबन पूल ६,७९० फूट लांब असून समुद्रात २.०८ किलोमीटरपर्यंत पसरलेला आहे. हा देशातील पहिला व्हर्टिकल लिफ्ट ब्रिज आहे.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे रविवारी रामनवमीच्या निमित्ताने तामिळनाडूच्या दौऱ्यावर होते. तामिळनाडूमध्ये त्यांनी अनेक प्रकल्पांची पायाभरणी केली. तसेच, प्राचीन तमिळ संस्कृती, सभ्यता आणि तमिळ इतिहासाचे दर्शन घडवणाऱ्या पंबन पुलाला राष्ट्राला समर्पित केले. यावेळी तामिळनाडूमध्ये ८,३०० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाच्या विविध रेल्वे आणि रस्ते प्रकल्पांची पायाभरणी केली. पंबन पूल 'मेक इन इंडिया' अंतर्गत बांधण्यात आला आहे आणि तो पुढील १०० वर्षांपर्यंत सुरक्षित राहणार असल्याचे सांगितले जात आहे. भारतीय रेल्वेचे प्रवक्ते दिलीप कुमार यांनी पान २ वर

## ईएमआयमध्ये पुन्हा होणार कपात?


### आरबीआयच्या पतधोरणाकडे सर्वसामान्यांचे लक्ष; ९ तारखेला होऊ शकते

**मुंबई । प्रतिनिधी**

**आर्थिक वर्ष २०२५–२६ ची सुरुवात झाली असून रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या अर्थात आरबीआयच्या पतधोरण विषयक समितीची बैठक सोमवारपासून सुरू होणार आहे. तर ही बैठक ९ एप्रिलला संपेल. या दिवशी आरबीआयचे गव्हर्नर संजय मल्होत्रा पतधोरण जाहीर करतील.**

आरबीआयने फेब्रुवारीमध्ये रेपो रेटमध्ये २५ बेसिस पॉईंटची (पाव टक्का) कपात केली होती. त्यामुळे रेपो रेट ६.५ टक्क्यांवरुन ६.२५ टक्क्यांवर आला होता. आरबीआयने पाच वर्षानंतर पहिल्यांदा रेपो रेट घटवले होते. आता एप्रिल ते जून या तिमाहीसाठी आरबीआय २५ बेसिस पॉईंटची कपात करण्याची शक्यता आहे. म्हणजेच रेपो रेट ६ टक्क्यांवर येऊ शकतो. त्यामुळे ईएमआयमध्ये कपात होण्याची शक्यता असल्याने सर्वसामान्यांचे याकडे लक्ष लागले आहे.

## हर्षवर्धन सपकाळ यांचा संविधान हाती घेऊन ऐतिहासिक काळाराम मंदिरात प्रवेश



**नाशिक । वृत्तसंस्था**

**नाशिकच्या ऐतिहासिक काळाराम मंदिरातील प्रवेशासाठी महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आंदोलन केले होते, पण तत्कालीन व्यवस्थेने त्यांना मंदिर प्रवेश नाकराला होता. रविवारी रामनवमीचे औचित्य साधत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी भारताचा नागरिक या नात्याने बाबासाहेबांनी लिहिलेले पवित्र संविधान हाती घेऊन काळाराम मंदिरात प्रवेश केला. यावेळी त्यांच्यासोबत कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांचे नातू कॅप्टन कुणाल गायकवाड, खा. शोभा बच्छाव व शेकडो कार्यकर्त्यांनी प्रभू रामाचे दर्शन घेतले.**

राम नवमी निमित्त कांग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी नाशिक येथील काळाराम मंदिरात प्रभू श्रीरामाचे दर्शन घेतले. यावेळी मंदिराचे महंत सुधीरदास तसेच काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रहात डॉ आंबेडकर यांच्या सोबत असलेले कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांचे नातू कॅप्टन कुणाल गायकवाड देखील उपस्थित होते. यावेळी महंत सुधीरदास यांनी १९३० साली मंदिरात प्रवेशापासून अडवणारे महंत हे माझे आजोबाच असल्याचे सांगून त्याबद्दल माफी मागून कुणाल गायकवाड यांचे मंदिरात स्वागत केले. यावेळी पान २ वर

## बलात्कार प्रकरणी जैन मुनी शांतीसागर महाराजांना १० वर्ष तुरुंगवास

**सुरत । वृत्तसंस्था**

**बलात्कार प्रकरणी दिगंबर जैन मुनी शांतीसागर महाराज यांना १० वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा न्यायालयाने सुनावली आहे. १९ वर्षीय मुलीवर बलात्कार केल्याप्रकरणी ही शिक्षा सुनावण्यात आली आहे. सुरत सत्र न्यायालयाने याबाबत त्यांना दोषी ठरवंले आहे.**



मिळालेल्या माहितीनुसार, दिगंबर जैन मुनी शांतीसागर महाराज यांनी २०१७ मध्ये, एका १९ वर्षांच्या श्राविका (महिला जैन भक्त) हिच्यावर बलात्कार केला होता. शुक्रवारी त्यांना या प्रकरणात दोषी ठरवण्यात आले. रविवारी त्यांची शिक्षा जाहीर करण्यात आली, ज्यामध्ये शांतीसागर यांना १० वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. २०१७ मध्ये, जैन मुनी सुरतमधील नानपूर येथील उपाश्रयात राहत होते. मूळ मध्य प्रदेशातील १९ वर्षांची मुलगी आणि तिचे कुटुंब, जे त्यांना आपले गुरु मानत होते, त्यांची शांतीसागरवर खूप श्रद्धा होती. शांतीसागर यांनी त्यांना पूजाविधीच्या बहाण्याने सुरत आश्रमात बोलावले होते. रात्री कुटुंब आश्रयस्थानात राहिले. यावेळी, रात्री ९.३० च्या सुमारास, शांतीसागर यांनी मुलीला पूजेचे निमित्त करून त्यांच्या पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०५ एप्रिल २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ४२.५० क्विंटल | २,००० | २,८०० | २,५७८ |
| ज्वारी/हायब्रिड: १४७.०० क्विंटल | १,७०० | ३,१०० | २,४३७ |
| मका/लोकल:३०.०० क्विंटल | २,१७५ | २,१७५ | २,१७५ |
| तूर : १४.५० क्विंटल | ६,५०१ | ७,१७१ | ६,९१६ |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: ७६.०० क्विंटल | १,८०० | २,७०० | २,४४२ |
| मुग :४.५० क्विंटल | ६,५०१ | ७,४५१ | ६,९७६ |
| सोयाबीन:१७४.०० क्विंटल | ४,४५० | ४,६०० | ४,५२८ |
| हरभरा: १४.०० क्विंटल | ४,५५१ | ५,५१९ | ५,२४२ |

# अयोध्येत श्री राम जन्मोत्सव उत्साहात

## श्री रामाची विशेष अभिषेक पूजा अन् सूर्यतिलक

**अयोध्या । वृत्तसंस्था**

**रविवारी श्री रामनवमीचा उत्सव संपूर्ण भारतवर्षात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. अयोध्येतही जगभरातून आलेल्या भाविकांनी राम मंदिरात सूर्य तिलक होतानाचे दृष्य आपल्या डोळ्यात साठवले. याआधी भगवान श्री रामाची विशेष अभिषेक पूजा संपन्न झाली. ही पूजा सुमारे तासभर सुरू होती. यानंतर श्री रामाचा भव्य श्रृंगार करण्यात आला. या सोहळ्याचे थेट प्रक्षेपण करण्यात आले.**

श्री राम नवमीच्या पार्श्वभूमीवर अयोध्येतील सर्व मंदिरे विविधरंगी फुलांनी सजवण्यात आली होती. श्री रामाच्या दर्शनासाठी देशभरातून मोठ्या संख्येने भाविक अयोध्येत दाखल झाले आहेत. सकाळी ९:३० वाजता जन्मात्सवाचा कार्यक्रम सुरू झाला. सर्वात आधी रामलल्लाचा अभिषेक विधी संपन्न झाला. राम मंदिरातील हा दुसरा जन्मोत्सव संपन्न होत आहे. सकाळी १०:३० वाजता एक तासभर भगवान श्री रामाचा श्रृंगार करण्यात आला. त्यानंतर नैवेद्य दाखवण्यात आला. दुपारी १२ वाजता राम लल्लाचा जन्मोत्सव सोहळा सुरू झाला. मंदिरात पूजा–आरती आणि सूर्यतिलक संपन्न झाला. यावेळी सूर्याची किरणे राम लल्लाच्या मुर्तीवर कपाळावरील टीळ्यावर येउन स्थिरावली आणि



सूर्यतिलक झाला. याआधी शनिवारी सूर्य तिलकची पान २ वर

cmyk

अग्रलेख

# युनूस यांची भुमिका चिंता वाढविणारी

बांगलादेशमध्ये शेख हसीना सरकार कोसळल्यानंतर तेथील सरकार भारतविरोधी वक्तव्ये सातत्याने करत आहे. नुकतेच तेथील हंगामी नेते मोहम्मद युनूस यांनी सिलीगुडी कॉरिडॉरबाबत एक वक्तव्य केले असून या विधानामुळे बांगलादेश चीनसोबत मिळून काही तरी कारस्थान रचत आहे का, याविषयी शंका वाढली आहे. हा कॉरिडॉर सुमारे २२ किलोमीटर रुंदीचा आहे. याद्वारे भारताची ईशान्येकडील राज्ये मुख्य भूप्रदेशाशी जोडलेले आहेत. त्याच्या सीमेला नेपाळ, भूतान आणि बांगलादेश लागून आहेत, तर उत्तरेला चीनशी जोडलेला तिबेट प्रांत आहे. त्यामुळे हा कॉरिडॉर भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील आहे. मोहम्मद युनूस नुकतेच बीजिंगमध्ये एका कार्यक्रमाला गेले होते. तेथे त्यांनी म्हटले, 'भारताची सात राज्ये भारताचा पूर्वेकडील भाग ज्यांना 'सेव्हन सिस्टर्स' म्हटले जाते, हे भाग पूर्णतः भूभागाने वेढलेले (लँडलॉक्ड) आहेत. समुद्राशी त्यांचा थेट संपर्क नाही. या संपूर्ण भागासाठी आम्ही एकमेव सागरी प्रवेशद्वार आहोत. हा भाग चीनच्या अर्थव्यवस्थेसाठी संधी ठरू शकतो. युनूस यांनी आपल्या भाषणात नेपाळ आणि भूतानचाही उल्लेख करताना असे म्हटले की, या दोन्ही देशांकडे जलविद्युतशक्ती आहे. ती ते स्वतःच्या कामासाठी वापरू शकतात. तसेच, बांगलादेशाद्वारे कोठेही जाऊ शकतात, कारण समुद्र थेट आमच्या मागे आहे. बांगलादेशाने चीनसोबत व्यापार वाढवण्याची चर्चा केली, हे वेगळे; पण भारताच्या सिलीगुडी कॉरिडॉरचा मुद्दा मुद्दाम उपस्थित करत त्यांनी अप्रत्यक्षरीत्या धमकी दिली आहे.

पश्चिम बंगालच्या सिलीगुडी भागात एक अरुंद पट्टा आहे, ज्याद्वारे भारताची ईशान्येकडील राज्ये मुख्य देशाशी जोडलेली आहेत. २२ किलोमीटर रुंदी आणि ६० किलोमीटर लांबीच्या या मार्गाला 'चिकन्स नेक' असेही म्हटले जाते. अरुणाचल प्रदेश, आसाम, मणिपूर, मेघालय, मिझोराम, नागालँड, सिक्कीम आणि त्रिपुरा ही आठ राज्ये या मार्गाने देशाशी जोडली जातात. हा मार्ग सुरक्षा दृष्टिकोनातून अत्यंत संवेदनशील मानला जातो, कारण या कॉरिडॉरच्या जवळ नेपाळ, भूतान आणि बांगलादेश आहेत. त्याचबरोबर, चीनलाही तिबेटमार्गे येथे सहज प्रवेश मिळू शकतो. या प्रदेशात असलेल्या नैसर्गिक संसाधनांमुळे तसेच चीनच्या सीमेवर असलेल्या संवेदनशीलतेमुळे या मार्गाचे महत्त्व अधिक आहे. येथूनच ईशान्य भागासाठी आवश्यक असलेल्या वस्तूंचा पुरवठा होतो, तसेच सैन्य हालचालींसाठी हा कॉरिडॉर अनिवार्य आहे. त्यामुळेच या २२ किलोमीटरच्या मार्गावर कोणताही परिणाम झाला, तर संपूर्ण देश धोक्यात येऊ शकतो. त्यामुळे या भागाला मजबूत सुरक्षा प्रदान करण्यात आली आहे.

१९६२ च्या भारत-चीन युद्धादरम्यान, चीनच्या सैन्याने अरुणाचल प्रदेशमध्ये झपाट्याने पुढे सरकत सिलीगुडी कॉरिडॉरच्या असुरक्षिततेला अधोरेखित केले होते. त्यांनी या कॉरिडॉरवर थेट हल्ला केला नाही, परंतु त्यांच्या हालचालींवरून ते सहज लक्षात आले की, हा भाग चीनसाठी 'सॉफ्ट टार्गेट' असू शकतो. २०१७ मध्ये चीनने भूतानच्या डोकलाम भागात रस्ता बांधण्याचा प्रयत्न केला होता. हा भाग सिलीगुडी कॉरिडॉरच्या अगदी जवळ आहे. त्यामुळेच भारताने याला आक्षेप घेत चीनच्या हालचाली रोखण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी दोन्ही देशांमध्ये दोन महिन्यांहून अधिक काळ लष्करी तणाव निर्माण झाला होता. या भागातील रेल्वे आणि रस्ते वाहतूक अत्यंत मर्यादित आहे. यामुळे, भारताने बांगलादेशाच्या चटगाव बंदराद्वारे ईशान्य भारत जोडण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. मात्र, युनूस यांच्या भारतविरोधी भूमिकेमुळे आता तज्ज्ञांचे मत आहे, की भारताला बांगलादेशावरचे अवलंबित्व पूर्णतः सोडावे लागेल.

युनूस यांच्या विधानानंतर भारताने यावर पर्याय शोधण्याची गरज आहे.

सिलीगुडी कॉरिडॉरच्या सुरक्षिततेसाठी भारताने अनेक उपाययोजना केल्या आहेत. भारतीय सैन्याने येथे मोठ्या प्रमाणावर तैनाती केली आहे. अतिरिक्त सीमा रस्ते, रेल्वे मार्ग आणि हवाई तळ उभारण्यावर सरकारने भर दिला आहे. या भागात भारतीय लष्कराच्या डिव्हिजन तैनात असून, आवश्यक वेळी अतिरिक्त तुकड्या पाठविण्याची क्षमता आहे.

भारत- भूतान आणि नेपाळसोबत घनिष्ठ संबंध ठेवून या भागात चीनच्या हस्तक्षेपास मर्यादा घालण्याचा प्रयत्न करत आहे. पण चीनच्या वाढत्या आक्रमकतेच्या पार्श्वभूमीवर आणि बांगलादेशातील सत्तांतरानंतर तिथून येणाऱ्या भारतविरोधी वक्तव्यांमुळे हा भाग आणखी संवेदनशील बनला आहे. त्यामुळे भारताला या भागाची सुरक्षा अधिक बळकट करण्याची गरज आहे. तसेच बांगलादेशावर अवलंबून न राहता पर्यायी मार्गांची व्यवस्था करणे ही काळाची गरज आहे.

## सहा वर्षाच्या मुलीवर आईच्या प्रियकराकडून लैंगिक अत्याचार; आरोपी अटक

जालना । प्रतिनिधी

**जालना शहरात सहा वर्षाच्या चिमुकल्या मुलीवर तिच्या आईच्याच प्रियकराने लैंगिक अत्याचाराबरोबरच अनैसर्गिक कृत्ये केल्याची खळबळजनक घटना जालना शहरात घडली आहे. सदरील आरोपीला कदीम जालना पोलिसांनी तात्काळ मुसक्या आवळल्या आहेत. सदरील आरोपी वय २८ वर्षे जालना येथे स्वर्ग हॉटेल मध्ये कामाला असल्याचे समजते तसेच सदरील आरोपी याचं लग्न झाले नसल्याचे समजते यामुळे सदरील महिलेसोबत आरोपीचे संबंध जुळले आहे.**

याप्रकरणी सविस्तर माहिती अशी की परभणी जिल्ह्यातील जिंतूर तालुक्यातील एक २८ वर्षीय महिला पतीपासून विभक्त झालेली असून, ती जुना जालना भागात रूम किरायाने घेऊन राहत आहे. तसेच तिला पहिल्या पतीपासून तीन मुली व एक मुलगा झालेला असून, त्यापैकी एक मुलगा व एक मुलगी पतिकडे जिंतूर येथे राहतात. तर एक ६ व दुसरी ४ वर्षाची मुलगी त्या महिलेकडे राहत आहे. सदर महिला घरगुती काम करून तिचा व मुलींचा उदरनिर्वाह भागवते आहे. अशाच दोन वर्षांपूर्वी तिची एका हॉटेलमध्ये मॅनेजर म्हणून काम करणाऱ्या प्रशांत प्रकाश वाडेकर याच्याशी ओळख झाली होती त्या ओळखीमुळे तेंव्हापासून ती महिला आणि वाडेकर हे दोघे दोन वर्षांपासून किरायाच्या रूम मध्ये एकत्रच पती-पत्नी प्रमाणे राहत होते व लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहत होते सदर महिला दुपारी ३.३० वाजेपर्यंत कामानिमित्त घराबाहेर असते तर वाडेकर हा दिवसभर घरी राहून रात्री ७.३० वाजेनंतर हॉटेलमध्ये ड्युटीवर जातो. काल दुपारी प्रशांत वाडेकर याने त्याची प्रेयसी असलेली महिला घरी नसतांना ६ वर्षीय मुलीवर आधी अनैसर्गिक कृत्ये केले आणि त्यानंतर तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. या प्रकारामुळे भयभीत झालेल्या चिमुकलीला खूप ताप आला होता, मोठ्या प्रमाणात उलट्याही होत होत्या. वाडेकर ड्युटीवर गेल्यानंतर त्या मुलीने तिच्यासोबत घडलेला सर्व प्रकार स्वतःच्या आपल्या आईला सांगितला. यापूर्वीही वाडेकर याने त्या चिमुकल्या बालिकेसोबत असे घाणेरडे प्रकार केल्याचे तिने आईला सांगितले. यानंतर सदर महिलेने तातडीनं कदीम जालना पोलीस ठाण्यात धाव घेत व तक्रार दाखल केली आहे. याप्रकरणी पोलीस निरीक्षक सिद्धार्थ माने, ज्ञानदेव नागरे, पोलीस उपनिरीक्षक किशोर वनवे यांनी तातडीने आरोपी प्रशांत प्रकाश वाडेकर यास ताब्यात घेतले आहे. दरम्यान, सदर गुन्हा पिंक मोबाईल पथकाकडे वर्ग करण्यात आला आहे. अशी माहिती पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सिद्धार्थ माने यांनी दिली आहे.



**बीडः एकनाथ नगर, भक्ती कंन्स्ट्रक्शन येथील संत गजानन महाराज मंदिरातील श्री राम मुर्तीची मुख्य आरती आज रामजन्माच्या दिवशी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांच्या हस्ते करण्यात आली. तसेच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नुतन जिल्हाप्रमुख पदी निवड झाल्याबद्दल उल्हास गिराम यांचा प्रतिष्ठान च्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी शिवतीर्थ प्रतिष्ठान चे संथापाक राजेश पिंगळे, सुरेश शेठ पिंगळे, पिंगळे तात्या, मुकुंद भालेकर, पंकज कुटे, अभिषेक पिंगळे यांच्या सह शिवसेना चे राजा भाऊ माहुवाले, सुशील पिंगळे, नवनाथ प्रभाळे, दिलीप नाना पवार, गणेश थोरात, शरद पवार, सतीशसिह परदेशीं, पिंटू माने सह परिसरातील शेकडो भाविक उपस्थित होते.**

# आ.नमिता मुंदडाच्या बंगल्यावर भाजपा स्थापना उत्सव साजरा

## जनतेला दिलेले आश्वासन पुर्ण करणारा पक्ष म्हणजे भारतीय जनता पार्टी-डॉ.शरदराव हेबाळकर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

**भारतीय जनता पार्टीच्या स्थापना दिनाच्या निमित्ताने केज विधानसभा मतदारसंघाच्या आ.सौ.नमिता अक्षय मुंदडा यांच्या आई निवासस्थानी विविध कार्यक्रम संपन्न झाले. ध्वजारोहण, कारसेवकांचा सत्कार, जेष्ठांचा सन्मान, मोटार सायकल रॅली आदी उपक्रम जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा यांच्या मार्गदर्शनाखाली घेतले. दरम्यान स्थापना दिना निमित्त बोलताना डॉ.शरदराव हेबाळकर यांनी भारतीय जनता पार्टी म्हणजे लोकांना दिलेले आश्वासन पुर्ण करणारा पक्ष, ज्यांनी राष्ट्र मंदिर बांधण्याचा केलेला संकल्प राम मंदिर उभा करूनच दाखवला. ३७० कलम बाजुला करून राष्ट्रभक्तीची ज्योत याच पक्षाने पेटवली. महापूरूषांच्या बलिदानापासुन स्थापन झालेला पक्ष म्हणजे भाजपा हे त्यांनी सांगितले. प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी यांनीही भाजपाच्या ऐतिहासिक वाटचालीची आणि सद्यस्थितीतल्या सुवर्णकाळाची ओळख कार्यकर्त्यांना करून दिली.**





महापुरूषांच्या प्रतिमेला अभिवादन करून कार्यक्रमाची सुरूवात झाल्यानंतर शहरातल्या ज्यांनी १९९२ ला कारसेवा केली, त्यांचा सत्कार आमदाराच्या वतीने शाल, पुष्पगुच्छ देवुन केला. सौ.शरयुताई हेबाळकर, प्रकाशराव जोशी, कल्याणी जोशी, उन्मेष माथेकर, दामोदर राऊत, रमाकांत सेलमोहकर, विनय जहागिरदार, आप्पाराव यादव, जेष्ठ पत्रकार हणुमंत पोखरकर, मुळे मॅडम, जयंत हमिने आदींचा समावेश होता तर पक्षाचे जेष्ठ नेते कांतीलाल केंद्रे, मामा रेणापुरे, नारायणरावजी केंद्रे, भास्करराव धर्मपात्रे, मोहनराव कराड, शामराव औसेकर, शशीकांत गायकवाड, डॉ.सुधीर धर्मपात्रे,माजी नगराध्यक्ष महादेव मस्के, सभापती काजगुंडे, ॲड.शरदराव इंगळे, अनंतराव आडसुळ आदीसह इतरांचाही सन्मान बैठकीत करण्यात आला. जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा यांनी कारसेवा करताना १९९२ साली झाशी येथे तब्बल तेरा दिवस या सर्व सहकार्यांना सोबत घेवुन जेलची सजा भोगली. त्याचे अनुभव कथन त्यांनी केले. अगदीच म्हटलं तर जेलमध्ये आम्ही सारे पेपर टाकुन झोपायचो. अन्नपाणीही पोलीसांनी खावु दिलं नव्हतं. स्व.प्रमोद महाजन, गोपीनाथराव मुंडे, विमलताई मुंदडा आदींच्या आठवणी त्यांनी यावेळी सांगितल्या. या मतदारसंघात पक्षाच्या माध्यमातुन काम करताना मंत्री पंकजाताई मुंडे, माजी खा. प्रितमताई यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही सर्वांना सोबत घेवुन काम करतो. माणसं जोडणं आणि एकत्रित रहाणं ही खर्या अर्थाने आता काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. कांतीलाल दादा केंद्रे यांनी जुन्या काळातील अनुभव सांगताना वर्तमान भाजप पक्षाला आलेले चांगले दिवस आणि या काळात असलेले कार्यकर्ते खरे भाग्यवान असल्याचे सांगितले. प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी भाजपा हा संस्कार आणि व्यक्तिमत्व घडवणारा पक्ष असुन जबाबदारी आणि कर्तव्य जाण ओळखुन कार्यकर्ता काम करतो. पक्षात काम करताना निष्ठा अत्यंत महत्वाची असुन जनसंघाच्या स्थापनेपासुन पक्षाची झालेली वाटचाल आणि राज्यात पक्ष वाढीसाठी स्व.गोपीनाथराव मुंडेंचे असलेले योगदान याची ओळख त्यांनी करून दिली. अध्यक्षीय समारोप करताना शरदराव हेबाळकर म्हणाले की, राजकिय व्यवस्थेत भाजपा म्हणजे लोकांना दिलेले आश्वासन पुर्ण करणारा पक्ष अशी त्याची ओळख. ज्या पक्षाने स्थापन होताना ३७० कलम बाजुला करू, प्रभु रामचंद्रांचं मंदिर बांधु हे सांगितलं ते पुर्ण करायला आजचा दिवस उजाडला. प्रकाश बोरगावकरांनी सुत्रसंचालन केले. अनंतराव आडसुळ त्यांच्या सर्व कार्यकर्त्यांनी उत्सव घडवुन आणल्याचं कौतुक मुंदडांनी केले.

## हिंदी विभागाच्या वतीने नवलेखक कार्यशाळा संपन्न

जालना । प्रतिनिधी

सृजनशीलता व नवाचार या विद्यार्थी केंद्रीत पाठ्यक्रमाचे प्रत्यक्ष स्वरूपात अंमलबजावणी ही श्रीमती दानकुँवर महिला महाविद्यालय, जालना व जेईस महाविद्यालय हिंदी विभाग यांच्या संयुक्त विदयमानाने आभासी पटलावरती आयोजित एकदिवसीय नवलेखक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सृजनशीलता व नवाचार मानवी जीवनात अत्यंत महत्तवाचा भाग असुन आपल्या संपूर्ण आयुष्याला कलाटणी देण्याची ताकद या नवलेखकांच्या लेखणी मध्ये आहे.असे कार्यशाळेच्या डॉ. प्रतिभा येरेकार यांनी प्रतिपादित केले. या कार्यशाळेचे उद्घाटन जेईस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांनी केले यावेळी त्यांनी या स्तुत्य अशा कार्यशाळेला शुभेच्छा दिल्या. कार्यशाळेचे प्रास्ताविक प्रा.पार्वती देशमुख यांनी आजची शिक्षणपद्धती ही तंत्रज्ञानावर आधारित आहे त्याच बरोबर कौशल्यावर अधिक भर असल्याचे आपणास दिसुन येते.उच्च शिक्षणामध्ये पाठ्यक्रमाचा प्रमुख उद्देश विद्यार्थी सृजनशीलताचा सर्वांगीण विकास घडवून आणणे होय.संक्षिप्त स्वरूपात कार्यशाळा आयोजित करण्यामागील उद्देश प्रस्तुत केला. तसेच डॉ. मीरा निचळे यांनी या आधुनिक युगात विशेष स्थान भाषेच्या क्षेत्रात कार्य करणा-या युवकांना रोजगाराच्या मागे जाण्याची गरज नाही.कौशल्य आत्मसात केल्याने रोजगार सहजरीत्या उपलब्ध होईल. स्वागत पर भाषण जेईस महाविद्यालयाचे डॉ. नानासाहेब गोरे यांनी प्रमुख वक्तायांचा परिचय तसेच कार्यशाळा आयोजन करण्याची वर्तमानातील गरज लक्षात आणुन दिली. कार्यशाळेचे अध्यक्ष श्रीमती दानकुँवर महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.डी.तळेकर यांनी असे म्हटले की, विद्यार्थीनींची सुप्त गुणांना वाव देणे ही महाविद्यालयाची प्रथम जबाबदारी असुन या कार्यशाळेच्या माध्यमातुन एक सृजनशील नवलेखक निर्माण होण्यास मदत होईल असे प्रतिपादित केले. संयोजक हिंदी विभाग प्रमुख प्रो.नानासाहेब गोरे ,प्रा.पार्वती देशमुख ,डॉ. विद्या पटवारी, डॉ. केशव सोळंके,डॉ. वासुदेव उगले,प्राध्यापक विद्यार्थी,संशोधक, मोठ्या संख्येने लिंक वरती जोडलेले होते.कार्यशाळेचे सूत्रसंचालन डॉ. सीमा गुप्ता तर आभार डॉ. वैशाली श्रीमंडले यांनी मानले.

# संसदेत वक्फ दुरुस्ती विधेयकाला मुस्लिम समाजाचा विरोध

## बीड जिल्हा मुस्लिम समाजाच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

बीड । प्रतिनिधी

**भारतीय संसदेमध्ये वक्फ दुरुस्ती विधेयका संबंधी मतदान घेवून वक्फ दुरुस्ती विधेयक पास केले त्यास मुस्लिम समाजाचा विरोध असून सदरील विधेयक रद्द करावे अशी मागणी बीड जिल्हा मुस्लिम समाजाच्यावतीने जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.**

निवेदनात म्हटले आहे की, बील बहुमताच्या जोरावर वक्फ दुरुस्ती विधेयक मंजुर करुन घेतले परंतू आर्टिकल नंबर १४ आणि १५ चे उल्घंन करुन बील पास करुन घेतले ही हेदजनक बाब आहे. वक्फ संशोधन बीड सुधारणा या नावावरती बील मंजुर केले परंतु त्याची खरी वस्तुस्थिती अशी आहे की, वक्फ सुधार नावाखाली मुस्लिम समाजाच्या हितासाठी केलेली व्यवस्था म्हणजे मुसलमान समाजाच्या जमीन मालमत्तेवर सरकार कब्जा करण्यासाठी बी.जे.पी सरकारने सदररील बील मंजुर केले आहे. संशोधन सुधार कायद्या पुर्वी वक्फ प्रॉपर्टी मध्ये काही त्रुटी आहेत, त्यामध्ये दुरुस्ती कराव्यात हे योग्य आहे परंतू याचा अर्थ असा नव्हे की, सरकारने यामध्ये व्यत्यय टाकुन गैर कलमे लावुन/तरतुदी करुन दखल अंदाजे केलेली आहे. म्हणजेच सरकारच्या कब्जा मध्ये घेण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. वास्तविक या सर्व जमीन मालमत्ता पुर्वी पासुनच निजाम सरकार/मुघल सरकार यांनी जमीन स्वताःहुन वक्फ/दान केलेले आहे. त्यामुळे या जमीनी मालमत्ता या सरकारच्या होवू शकत नाहीत. म्हणून सरकारचा या मालमत्तेवर कब्जा करण्यास कसलाही अधिकारी नाही. जनतेची दिशाभुल करुन, तरतुदी करुन बील पास करुन घेतले ते मुस्लिम समाजाला आमान्य आहे. या जमीनीचे व्यवस्थान वक्फ सरकारी कायद्याच्या अधिकारात आहे. आणि या कायद्याची व्यवस्था मुस्लिम समाजाच्या हितासाठी इंग्रजाच्या राजवटी पासुन ते भारत स्वांतत्र्य झाल्यापासुन चालु आहे. व पुढेही चालु राहणार यामध्ये बी.जे.पी. सरकारचा कब्जा खपुन घेतला जाणार नाही. बी.जे.पी. सरकारने वक्फ संशोधन बीड यामध्ये सुधारण्याच्या नावावर सरकारच्या विविध बाबीमध्ये हस्तक्षेप करण्यासाठी तरतुदीचा वापर जास्त प्रमाणात केलेले आहे. यामध्ये नंतर मुस्लिम समाज कायद्यान्वय काहीही करु शकणार नाही. जे निव्वळ दिशाभूल करणारा आणि अ संविधानीक बील पास करुन घेतले जे आम्हाला अमान्य असून त्यास आमचा विरोध आहे. कित्येक वर्षापासुन वंश परापंरागत रितीरिवाजाप्रमाणे सदर वक्फ बोर्ड बील याची नोंद सरकार दरबारी न केल्यामुळे आणि रजिस्ट्री आमच्याकडे नसल्याने (कारण या प्रॉपर्टी पुर्वीच्या काळी रजिस्ट्री करण्याची पध्दत नव्हती पुर्वीच्या राजवटी मध्ये राजा महाराजा निजाम सरकार इत्यादी हे खुश होवून सदर प्रॉपर्टी वक्फ/दान करीत होत्या) म्हणजे या जमीनी सरकारी नव्हत्या म्हणूनच त्या जमीनीवर सद्या बी.जे.पी सरकारने बील मंजुर करुन घेतले जे मुस्लिम समाजाला मान्य नाही त्यास आमचा विरोध असून सदरील वक्फ दुरुस्ती विधेयक नामंजूर करावे अशी मागणीही निवेदनाद्वारे मुस्लिम समाजाच्यावतीने करण्यात आली आहे. या निवेदनावर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या शहराध्यक्षा शेख गुलरुखजहीण राणीताई शेख, शाहबाज-ए-लामाकानी कादरी फाऊंडेशनचे प्रदेशाध्यक्ष शेख शहबाज कादरी, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष खुर्शीद आलम, लोकसेना संघटनेचे प्रमुख ॲड.प्रा.इलियास इनामदार, काँग्रेसचे इत्मियाज कुरेशी, मोमीन अब्दुल खय्युम, मुमोनी मुजाहीर, वाजेद शेख, सय्यद उबेद, स्नेहा खंडागळे, कैसर जहाँ, सय्यद खदीर साहस, सय्यद रुक्साना, शेख मन्सूर, सय्यद सलीम आदींच्या निवेदनावर स्वाक्षर्या आहेत.

# पान १ वरून...

### अखेर माणिकराव

मुळात शेतकऱ्यांना कर्ज मागण्याची वेळच येऊ नये अशा मताचा मी आहे. शेतकरी सक्षम झाला पाहिजे, यासाठी राज्य सरकार प्रयत्न करत असल्याचे मामिकराव कोकाटे यांनी म्हटले आहे.

------------

### बीड जिल्ह्यातील ६ तर राज्यभरातील

काही न्यायाधीशांचा समावेश आहे. हायकोर्टाकडून १९४ न्यायाधीशांना बढती देण्यात आली आहे. त्यामध्ये बीड जिल्ह्यातील एकाही न्यायाधीशांचा समावेश नाही. बीडप्रमाणेच इतर जिल्ह्यांमधील न्यायाधीशांच्याही बदल्या करण्यात आल्या आहेत.

----------

### पंतप्रधान मोदींच्या हस्ते देशातील पहिल्या

याबाबतची माहिती दिली, देशातील सर्वोत्तम अभियांत्रिकी रचना असलेला पंबन पूल आता तयार झाला आहे. हा परूल 'मेक इन इंडिया' अंतर्गत बनवला गेला आहे जुना पूल उघडण्यासाठी साधारणपणे ४५ मिनिटे लागतात, तर नवीन पूल फक्त पाच मिनिटात उघडतो आणि ३ मिनिटात बंदही होतो. त्यांनी पुढे सांगितले की, पंबन पुलाजवळ समुद्रातील वारे खूप वेगाने वाहतात. कधी कधी वाऱ्याचा वेग १०० किलोमीटर प्रतितास इतका असतो. त्यामुळे सुरक्षेच्या दृष्टीने सिग्नलला वाऱ्याच्या वेगाशी जोडले आहे. उदाहरणार्थ, वाऱ्याचा वेग ५० किलोमीटर प्रतितासापेक्षा जास्त झाल्यास, तात्काळ रेल्वेची वाहतूक थांबवण्यात येईल.

----------

### शेतकरी नेते दल्लेवाल यांच

जमलेल्या किसान महापंचायत वेळी त्यांनी ही घोषणा केली. कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान व रेल्वे राज्यमंत्री रवनीत सिंग बिट्टू यांनी शनिवारी दल्लेवाल यांना उपोषण थांबवण्याची विनंती केली होती. त्यानुसार रविवारी सकाळी दल्लेवाल म्हणाले की 'मला बेमुदत उपोषण सोडण्याबाबत विनंती करण्यात आली होती. मी तुमच्या भावनांचा आदर ठेवतो व मी हे उपोषण स्थगित करत आहे.' याबाबत चौहान यांनी आपल्या एक्स पोस्टवर लिहले आहे की सरकारचे प्रतिनिधी व शेतकऱ्यांचे प्रतिनिधी यांच्यात चर्चा झाली असून शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत सकारात्मक विचार सुरु आहे. शेतकरी जगजित सिंग दल्लेवाल हे नुकतेच हॉस्पिटलमधून परतले आहेत. मी आशा करतो की त्यांच्या प्रकृतीत लवकरच सुधारणा होईल. आम्ही त्यांना उपोषण सोडण्याबाबत विनंती केली होती व शेतकरी प्रतिनिधींशी चर्चा केली जाईल'.

------------

### बलात्कार प्रकरणी जैन मुनी

खोलीत बोलावले आणि कुटुंबातील सदस्यांना खोलीबाहेर उभे राहण्यास सांगितले. यावेळी, पूजेच्या बहाण्याने धमकी देऊन मुलीवर बलात्कार करण्यात आला. सुरुवातीला कुटुंब आपला सामाजिक आदर गमावू नये म्हणून गप्प बसले, परंतु नंतर इतर मुलींसोबत असे घडू नये असे वाटून, कुटुंबाने घटनेच्या १३ दिवसांनी सुरतमधील अथवलाइन्स पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून जैन मुनी शांतीसागर यांना अटक केली. पीडितेने तिच्या तक्रारीत असाही आरोप केला आहे की, घटनेच्या काही दिवस आधी जैन मुनी तिच्याशी फोनवर बोलले होते आणि पूजाविधीसाठी पीडितेचा नग्न फोटोही मागितला होता. ते म्हणायचे की पूजेसाठी असे चित्र आवश्यक आहे. बलात्काराच्या आरोपानंतर, शांतीसागर यांना सुरतच्या अथवलाइन्स पोलिसांनी अटक केली. तेव्हापासून ते सतत सुरतमधील लाजपोर तुरुंगात न्यायालयीन कोठडीत होते. आरोपपत्र सादर झाल्यापासून सत्र न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी सुरू होती. फिर्यादी पक्षाने ३३ साक्षीदार हजर केले. वैद्यकीय तपासणी आणि फॉरेन्सिक अहवालासह सर्व कागदोपत्री पुरावे सादर करून आरोप यशस्वीरित्या सिद्ध करण्यात आले. त्यानुसार सुरत सत्र न्यायालयाने आरोपी जैन मुनी शांतीसागर यांना १० वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली आणि २५००० रुपये दंडही ठोठावला आहे.

---------------

### हर्षवर्धन सपकाळ यांचा संविधान हाती

सपकाळ यांनी महंत सुधीरदास यांना भारतीय संविधानाची प्रत भेट दिली. त्यानंतर माध्यमांशी संवाद साधताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, मर्यादा पुरुषोत्तम प्रभू राम हे सर्वांचे आहेत, ते भारतीय संस्कृतीचे अविभाज्य अंग आहेत. राम नवमीनिमित्त काळाराम मंदिरात जाऊन प्रभू रामाचे दर्शन घेतले व ''देशात व राज्यात समतेचा, बंधुत्वाचा व संविधनाचा विचार नांदावा'', अशी कामना व्यक्त केली. या काळाराम मंदिराला मोठा इतिहास आहे. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी काळाराम मंदिरात प्रवेश मिळावा यासाठी १९३० ते १९३५ अशी पाच वर्ष १७ दिवस सत्याग्रह केला पण त्यांना मंदिरात प्रवेश नाकारला. मंदिराचे चारही दरवाजे बंद करण्यात आले होते. यावेळी दंगल होऊन त्यात बाबासाहेब आंबेडकर जखमी झाले होते. दुसऱ्या वर्षी ते गोलमेज परिषदेला गेले असता दादासाहेब गायकवाड, साने गुरुजी यांनी सत्याग्रहाची धुरा सांभाळली पण पाच वर्ष सत्याग्रह करूनही त्यावेळच्या व्यवस्थेने त्यांना प्रवेश दिला नव्हता. पण आज दादासाहेबांचे नातू कॅप्टन कुणाल गायकवाड यांच्यासह आम्ही प्रभू रामाचे दर्शन घेतले आणि मंदिरात महंतांनी आमचे स्वागत केले.

---------

### अयोध्येत श्री राम

ट्रायल घेण्यात आली होती. जन्मोत्सवाचे थेट प्रक्षेपण करण्यात आले. दुपारी १२ वाजता रघुकुलात रामलल्लाच्या जन्माने भक्तांमध्ये आनंदाचे आणि भक्तीभावाचे वातावरण अनुभवायला मिळाले.

----------

cmyk

राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

सोमवार, दि. ७ एप्रिल २०२५



## भ्रष्टाचार निर्मुलन समितीची आज बैठक

**बीड । प्रतिनिधी**

**जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मुलन समिती बीड तथा जिल्हाधिकारी बीड यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार दि. ७ एप्रिल २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात सकाळी १०. ३० वाजता बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.**

बीड जिल्हयातील शासकीय कर्मचा-याविरुध्द प्राप्त होणा-या तक्रारींबाबत पाठपुरावा करण्यासाठी जिल्हास्तरीय भ्रष्टाचार समिती स्थापन करण्यात आली असून त्याअनुषंगाने नागरिकांनी शासकीय अधिकारी, कर्मचा-याविरुध्द भ्रष्टाचारासंबधी तक्रार असल्यास जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मुलन समितीसमोर व्यक्तीशः उपस्थित राहून लेखी स्वरुपात मांडाव्यात सदर तक्रारीसोबत पुरावे जोडले गेले नसल्यास अशा तक्रारी घेतल्या जाणार नाहीत, असे सदस्य सचिव जिल्हा भ्रष्टाचार निवारण समिती तथा निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

# रामायणातील मार्गदर्शक तत्वे समाज व्यवस्थेला निकोप बनवतात - महंत लक्ष्मण महाराज मेंगडे

### वै.संत सुदामदेव महाराज यांच्या पुण्यतिथी उत्सवाची व रामजन्मोत्सवाची थाटात सांगता; २५ हजार भाविकांची उपस्थिती.नेकनूर मध्ये लोटला जनसागर

**नेकनूर । प्रतिनिधी**

**श्रीक्षेत्र नेकनूर येथील श्रीराम मंदिरात मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीरामचंद्र यांचा जन्मोत्सव सोहळा व संत वै सुदामदेव महाराज यांच्या पुण्यतिथी उत्सवाची मोठा थाटात सांगता झाली. महंत लक्ष्मण महाराज मेंगडे यांचे काल्याचे कीर्तन झाले. यावेळी त्यांनी रामायणातील मार्गदर्शक तत्वे समाज व्यवस्थेला निकोप बनवतात.. रामराज्य येण्यासाठी रामायणातील सुसंस्काराची गरज आहे.असेही महाराज म्हणाले.यावेळी हजारो भाविक भक्तांची उपस्थिती होती.**

यावेळी प्रमुख उपस्थिती खा बजरंग सोनवणे, उपमुख्यमंत्री यांचे विश्वासू बाजीराव चव्हाण,श्री ह भ.प हरिहर भारती महाराज,श्री ह भ प नवनाथ महाराज जरुडकर, नाना महाराज कदम श्री ह भ प सत्यवान महाराज लाटे, सुरेश महाराज जाधव , दिनेशानंद महाराज काळे, श्रीकृष्ण महाराज यादव,विश्वनाथ अप्पा कपिलधार, अच्युत महाराज घोडके, महंत आदिकनाथ महाराज, यांच्या सह बंकटस्वामी संस्थानचे सर्व विश्वस्त व हजारों भविक भक्ताची उपस्थिती होती.

बीड तालक्यातील श्रीक्षेत्र नेकनुर येथे श्रीराम मंदीरात संत सुदामदेव महाराज यांच्या २३ व्या पुण्यतिथी उत्सवाची रविवारी काल्याच्या कीर्तनाने थाटात सांगता झाली. महंत लक्ष्मण महाराज मेंगडे यांनी संत निळोबाराय यांच्या

जिवलग माझे गडी ।
न गमे घडी तुम्हांविण ।।१।।
सांगा जे जे मनोरथ ।
पुरवीन आर्त तुमचें तें ।।२।।
नका आतां उदासीन ।
करुं मन मजवरी ।।३।।
निळा म्हणे हरि ऐसा ।
करी लालसा दासांची ।।४।।



या अभंगावर सुंदर चिंतन मांडले. दृष्टां चा संहार आणि भक्ताचे रक्षण करून धर्माचे संस्थापना करणे हे देवाच्या अवताराचे महत्त्वाचे कारण असते भगवंताच्या दहा अवतार पैकी राम आणि कृष्ण अवतार पूर्ण आहेत , श्रीराम अवतारातिल चरित्र आचरणात आणावे.तर कृष्ण अवतारातिल चरित्र फक्त उच्चार करावा ,दोघांची भक्ति करतांना शुध्द अंतकरण असावे असा संदेश दिला.. देव गोपाळांना तुम्ही माझे जिवलग आहात तुमच्याशिवाय मला करमत नाही तुम्ही जे सांगाल ते आर्त मी पुरवायला तयार आहे. त्यामुळे उदासीन होऊ नका.. भक्तांच्या सर्व इच्छा देव पूर्ण करत असतो असा निळोबारायांनी सांगितलं असं महाराज म्हणाले यावेळी वेगळे दृष्टांतही दिले..

संत सुदामदेव महाराज यांच्या २३ पुण्यतिथी निमित्त बोलतांना बाबांचे आयुष्य हे त्यागी होते ,गुरु सेवेत सर्वस्व अर्पण करणारे इच्छा मरणी साधु आपल्याला लाभले हे भाग्य आहे ,गौर गरीब जनतेच्या दुःख मुक्ती साठी आणि आत्म उधारासाठी बाबानी संपूर्ण आयुष्य समर्पित केले ,प्रेमळ अंतकरणाचा दयाळू साधु असे सुदामदेव महाराज होते. त्यांच्या नंतर परमार्थ चालवताना पदों पदी आठवण येते.तसेच वै.रामहरी बाबा यांची आठवण कायम स्मरणात राहील.असे मेंगडे महाराज यांनी सांगितले ,सामाजिक बदलाची नांदी शिक्षनाचे महत्व ,व्यसन मुक्ती शेतकरी आत्महत्या आदि विषयावर प्रबोधन केले.

यावेळी गायनाचार्य रंजीत महाराज शिंदे, वसंत महाराज शिंदे, भास्कर महाराज शिंदे, पखवाज साथ संगत राम महाराज, संदीप महाराज आरडे,आदिंची उपस्थिति होती.तसेच हजारो च्या संख्येने भाविक भक्त व बंकटस्वामी महाराज फडावरील सर्व टाळकरी उपस्थित होते शेवटी काल्याचां अभंग म्हणून दही हंडी पोडुन माहाप्रसाद वाटप करण्यात आला ,हजारोच्या पंगतीत मध्ये बूंदी आणि लाही चिवडयाचा माहाप्रसाद वाटप केला गेला.

१) संत बंकट स्वामी महाराज यांचे शिष्य असलेल्या सुदाम देव महाराजांच्या समाधी स्थळा जवळ संरक्षण कठडा आवश्यक आहे त्यासाठी निधी देऊ. तसेच देवस्थानच्या विकास कामात भरीव निधी मिळण्यासाठी पाठपुरावा करू असा शब्द खासदार बजरंग सोनवणे यांनी दिला..

नेकनूर येथे राम जन्मोत्सव व भव्य अखंड हरीनाम सप्ताहात काल्याचे कीर्तन करताना श्री भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे व हजारोच्या संख्येने भाविक भक्त,

# गृह राज्यमंत्री योगेश कदम यांचा मोबाईल चोरी गेलाच नाही, विरोधकांनी अफवा पसरवने बंद करावे - अनिल जगताप

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा दौऱ्यावर असताना गृहराज्यमंत्री योगेश कदम यांचा मोबाईल चोरी गेल्याच्या बातम्या शनिवारी दिवसभर सर्व टीव्ही चॅनलवर, पोर्टलवर सुरु होत्या. मंत्र्यांच्या मोबाईल चोरीच्या बातमीने राज्यभर खळबळ उडवून दिली. मंत्र्यांचाच मोबाईल सुरक्षित नाही तिथे सर्वसामान्यांचे काय? असा प्रश्न देखील नेत्यांमधून उपस्थित होऊ लागला होता. या सर्व प्रकारानंतर शनिवारी रात्री उशिरा बीड पोलीस अधीक्षकांनी मोबाईल फोन विसरला होता नंतर तो कोणीतरी आणून दिला असे स्पष्टीकरणही दिले आहे. मात्र विरोधक आऊचा बाऊ करून सोशल मीडियावर अफवांचे वावडळ आणत आहेत. याबद्दल शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी पत्रक कढून सविस्तर माहिती दिली आहे की, विविध समाज माध्यमांवर व विविध न्यूज पोर्टलवर मा. योगेश कदम, राज्यमंत्री (गृह) महाराष्ट्र राज्य हे मस्साजोग ता. केज येथे आलेले असतांना त्यांचा मोबाईल गहाळ/चोरी गेल्याची बातमी प्रसारित झाली. परंतु सदर बाबत सत्यता अशी आहे की, मा. मंत्री महोदय हे मस्साजोग येथे धनंजय देशमुख व कुटुंबीयांचे सांत्वन करण्यासाठी धनंजय देशमुख यांच्या शेजारी बसलेले होते. पत्रकारांशी संवाद साधताना मोबाईल खाली ठेवला होता त्यानंतर ते बांधकाम सुरू असलेले घराची पाहणी करण्यासाठी चालत गेले.घराची पाहणी करत असताना त्यांनी पीएंकडे मोबाईल मागीतला त्यावेळी पीएंनी माझ्याकडे मोबाईल नाही असे सांगीतले.



त्यावेळी मंत्री महोदय यांनी मोबाईल शोधा असे म्हटले. हे वाक्य उपस्थित लोकांपैकी कुणीतरी ऐकून बाहेर वाच्यता केली. परंतु मंत्री महोदय व मी स्वतः जाण्यासाठी गाडीत बसलो असता कोणीतरी मोबाईल आणून माझ्याकडे दिला व तो मोबाईल मी स्वतः मंत्री महोदय योगेश कदम यांच्याकडे दिला. मंत्री महोदयांना त्यांचा मोबाईल मिळाला आहे, हे बाहेर माहीत नसल्यामुळे या अफवा जाणीवपूर्वक पसरवल्या चालल्या आहेत. मंत्री महोदय यांचा मोबाईल चोरी झालेला नाही. कृपया कोणीही अफवांवर विश्वास ठेऊ नये. महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते ना. एकनाथजी शिंदे साहेब खासदार डॉ श्रीकांतजी शिंदे साहेब हे देशमुख कुटुंबीयांना मदतीचा एक हात म्हणून स्वतःच्या हक्काचे घर बांधून देत आहेत. देशमुख कुटुंबियांचे सांत्वन करण्यासाठी तसेच त्यांना बांधून देत असलेल्या घराच्या बांधकामाची पाहणी करण्यासाठीवारंवार शिवसेनेचे विविध नेते, मंत्री मस्साजोग येथे येऊन भेट देत आहेत. घडलेली घटना अत्यंत साधारण होती. मात्र विरोधकांनी गृह राज्यमंत्री योगेश कदम यांचा मोबाईल चोरीला गेल्याच्या अफवांचे वावडळ आणले असून सोशल मीडियावर बीडची बदनामी करणे सुरु केले आहे. विरोधकांनी अफवा पसरवने बंद करावे आणि बीडची बदनामी थांबवावी असे आवाहन शिवसेना बीड जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी प्रसार माध्यमांमध्ये पत्रक जाहीर करून केले आहे.

## साखर कारखाना प्रकरणी याद राखा गाठ माझ्याशी आहे एकालाही सोडणार नाही! आ.खोतकर

जालना । प्रतिनिधी

जालना मंठा रोडवरील रामनगर येथे बंद असलेला जालना रामनगर सहकारी साखर कारखाना शासनाच्या नियमाप्रमाणे प्रक्रिया पूर्ण करून सध्या शिवसेनेचे आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या ताब्यात आहे. पण या प्रकरणी या कारखान्याच्या राजकारणामध्ये कोणी मिठाचा खडा टाकण्याचा प्रयत्न करू नये असा गंभीर इशारा आमदार अर्जुन खोतकर यांनी दिला आहे. सदरील कारखान्याची परिस्थिति गंभीर असत्यांनी याकडे कोणी लक्ष दिले नाही. यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून हा कारखाना बंद आहे. त्यामुळे कामगारांची देणे ही थकलेले आहेत. एकूणच या




परिस्थिती संदर्भात अनेक वेळा आंदोलने झाली आणि ती शांतही झाली. परंतु पुन्हा काल गुरुवार दिनांक ३ रोजी सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी या भागामध्ये कारखान्याचे तत्कालीन कामगार आणि शेतकऱ्यांचा मेळावा घेतला . या मेळाव्याच्या प्रतिउत्तरामध्ये आज आमदार अर्जुन खोतकर म्हणाले,'' कालपासून पुन्हा माझी खोटी बदनामी करणे सुरू केलेआहे. ही बदनामी मी सहन करणार नाही याद राखा गाठ माझ्याशी आहे मी एकालाही सोडणार नाही. कारखान्यातून रस्ता जाऊ द्यायचा किंवा नाही तो माझा प्रश्न आहे आणि आता तर रस्ता जाऊच देणार नाही. त्यांनी फक्त कामगारांच्या देणे देण्यापुरतं बोलायला हवं होतं. कोणाला कुठे दाबायचं हे आपल्याला चांगलं माहित आहे. तसेच हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे त्यामुळे न्यायालयाचा आदर करणे व मी जास्त याविषयी बोलणार नाही असे शेवट आमदार अर्जुनराव खोतकर म्हणाले.

# पाटोदा येथे रामजन्मोत्सव उत्साहात साजरा

### जय श्रीरामच्या जयघोषात अवघी पाटोदा नगरी दूमदूमली

**पाटोदा । प्रतिनिधी**

**मर्यादा पुरूषोत्तम प्रभु रामचंद्राचा जन्मोत्सव म्हणजेच रामनवमी पाटोदा शहरात अत्यंत उत्साहात व भक्तीमय वातावरणात विविध कार्यक्रम घेऊन साजरी करण्यात आली. सकाळी शहरातून काढण्यात आलेल्या मिरवणुकी मध्ये राम भक्तांनी दिलेल्या जय श्री राम च्या घोषणांनी पाटोदा शहर दुमदुमून गेले होते.**



शहरातील प्रभू श्री राममंदिर या ठिकाणी सकाळ पासुनच भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. सकाळी प्रभू श्री राम मंदिराचे विश्वस्थ चंद्रकांत एकबोटे यांच्या हस्ते अभिषेक व महाआरती करण्यात आली , तर दूपारी ठीक १२. वाजता मुख्य राम जन्मोत्सव साजरा करण्यात आला, यावेळी उपस्थित भाविकांनी रामनामाचा गजर करीत फूलांची उधळण केली, तत्पूर्वी राम जन्मोत्सवा निमित्त समिति मार्फत ह. भ. प. प्रतिभाताई गायकवाड यांच्या वाणीतून या राम कथेचे आयोजन करण्यात आले होते. रामजन्मोत्सवा नंतर त्यांचे हरीकीर्तन पार पडले. तत्पूर्वी रामजन्मोत्सवानिमीत्त शहरातून भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते , तब्बल साडे सात फुट उंचीची भव्य श्री राममुर्ती मिरवणुकीचे आकर्षण होते,या निमीत्त संपुर्ण शहरातुन रथामध्ये ठेवण्यात आलेल्या राममुर्तीची भव्य मिरवणुक काढण्यात आली , या प्रसंगी उत्सव समीतीच्या कार्यकर्त्यांसह रामभक्त नागरीकांची मोठया संखेने उपस्थिती होती.

# बीडमध्ये महाराणा प्रताप यांच्या पुतळ्यासाठी जागा द्या-सकल राजपूत समाजाचे पालकमंत्र्यांना निवेदन

बीड । प्रतिनिधी

शहरात महाराणा प्रताप यांच्या पुतळ्यासाठी जागा उपलब्ध करून देण्यासह इतर विविध मागण्यांचे निवेदन उपमुख्यंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांना सकल राजपूत समाजाच्यावतीने देण्यात आले. यावेळी समाजबांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

राजपूत समाजासाठी वीर शिरोमणी महाराणा प्रताप यांचे स्थान अत्यंत पूजनीय आहे. त्यांचे पराक्रम, स्वाभिमान आणि स्वातंत्र्यासाठीचे बलिदान संपूर्ण राष्ट्रासाठी प्रेरणादायी आहे. बीड शहरातील राजपूत समाजासह अन्य नागरिकांच्या मागणीनुसार शहरात एका प्रमुख ठिकाणी महाराणा प्रताप यांचा भव्य पुतळा उभा करण्यात यावा. हा पुतळा



केवळ राजपूत समाजासाठीच नव्हे, तर संपूर्ण समाजासाठी इतिहास आणि प्रेरणेचे प्रतीक ठरेल. तसेच, तरुण पिढीला देशभक्ती व स्वाभिमान यांचे महत्त्व पटवून देण्यास उपयुक्त ठरेल. या मागणीस सकारात्मक प्रतिसाद देऊन बीड शहरातील योग्य ठिकाणी महाराणा प्रताप यांच्या पुतळ्यासाठी जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणीही निवेदनाद्वारे अजित पवार यांच्याकडे करण्यात आली.

यावेळी राणा चौव्हाण, किशन चौव्हाण,नितीन राजपूत, प्रणवसिहं बुंदेले, अभयसिहं बुंदेले, अनुपसिंह बुंदेले, ॲड. युवराज बहिरवाळ, अरविंदसिह पाटील, सोनल अरविंदसिंह पाटील, अखिलसिहं बुंदेले, विक्रमसिंह कपुर, ओमप्रकाशसिंह कश्यप, गणेश बहिरवाळ, अशोकसिहं दिक्खत, विजयसिंह ठाकुर, हनुमानसिंह ठाकूर, मोतीसिंग राजपूत, रणवीरसिंग ठाकूर, रामचंद्र परदेशी, विनोदसिंह बुंदेले, रामेश्वरसिंह ठाकूर, ॲड. दिलीपसिंह ठाकूर यांच्यासह समाजबांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# युवा पत्रकार अंकुश गवळी व लहु गवळी यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाने साजरा

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील आदर्श देवगाव येथील समाजभूषण युवा पत्रकार अंकुश गवळी व लहु गवळी यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने दर वर्षी प्रमाणे याही वर्षी... वडवणी येथील दीपस्तंभ गुरुकुल वडवणी व बीड येथील जिव्हाळा अनाथ आश्रम येथे खाऊ वाटप व गुरुकुल च्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप व खाऊ वाटप करण्यात आले आहे.



दिवसेंदिवस वाढदिवस. करण्याच्या पद्धती आपण बदलताना पाहत आहोत परंतु ह्या गोष्टींना बाजूला ठेवून युवा पत्रकार अंकुश गवळी व लहु गवळी यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने शालेय साहित्य वाटप केले.. असे नवीन उपक्रम युवकांनी राबवले पहिजे असे प्रतिपादन ज्ञान संस्कार गुरुकुल चे संचालक ईतापुरे सर यांनी केले आहे.. उपक्रम राबवणाऱ्या युवकाला परिसरातील माणसांनी जपले पाहिजे. यावेळी कार्यक्रम ला दीपस्तंभ गुरुकुल संचालक सुसेन मुंडे सर. व ईतापुरे सर.उद्योजक शहाजी बप्पा लोकरे. मुंडे सर. बळीराम गवळी. दत्ता गवळी. करण लोकरे. ईत्यादी उपस्थित होते. वाढदिवसा निमित्त संपूर्ण राज्यभरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.राजकीय नेते, अभिनेते,सामाजिक कार्यकर्ते, डॉक्टर,पत्रकार,वकील,व्यापारी तसेच त्यांच्या मित्र परिवाराने त्यांना वाढदिवसा निमित्त हार्दिक शुभेच्छा दिल्या.पत्रकार अंकुश गवळी यांनी पत्रकारितेत आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या निर्भीड आहेत. सत्य आणि न्यायाच्या मार्गावर चालत त्यांनी अनेक सामाजिक प्रश्नांना वाचा फोडली आहे.त्यांच्या वाढदिवसा निमित्त राज्यभरातून शुभेच्छा संदेश,फोन कॉल आणि सोशल मीडियावर पोस्टच्या माध्यमातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. अनेक मान्यवरांनी त्यांच्याबद्दल गौरवोद्गार काढले असून, त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.राजकीय क्षेत्रातील अनेक दिग्गज नेत्यांनी त्यांना शुभेच्छा देत त्यांच्या कार्याची प्रशंसा केली आहे. तसेच, सामाजिक संस्थांचे कार्यकर्ते, विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्तींनीही त्यांना शुभेच्छा दिल्या. पत्रकारिता क्षेत्रातील सहकारी आणि हितचिंतकांनी देखील त्यांना गवळी अंकुश गवळी लहु यांच्या वाढदिवसा निमित्त विविध ठिकाणी सत्कार समारंभ व सामाजिक उपक्रम साजरा करण्यात आला आहे भावना व्यक्त करत सर्वांचे आभार मानले..

# मनका विकार तज्ञ डॉ बालाजी नवले यांनी दिली सप्ताहमध्ये रूग्णसेवा

### तिरुपती सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलचे बोरफडी येथे मनका विकार शिबिर

**बीड । प्रतिनिधी**

**सुप्रसिद्ध अस्थिरोग तज्ञ तथा मनका विकार तज्ञ डॉ बालाजी नवले यांच्या ''तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल बीड''बोरफडी ता.जी बीड येथे सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह मध्ये सामाजिक जाणीव म्हणून बोरफडी करांसाठी व सर्व भाविकांसाठी ''मोफत भव्य मनका विकार'' व अस्थिरोग तपासणी शिबिराचे आयोजन युवा नेते निखिल कुटे यांच्याकडून करण्यात आले होते. या शिबिरामध्ये शेकडो भाविकांनी आपली तपासणी करून घेतली.**



तसेच या शिबिरामध्ये मनका कमकुवत होणे, स्लिप डिस्क, सायटिका, मणक्यात गॅप असणे, स्पाँडिलेसिस, मणक्याचे संसर्गजन्य आजार, लहान मुलांमधील मणक्याचे बाक, मणक्याचे फ्रॅक्चर, गुडघा दुखी मान दुखी, इत्यादी ठिकाणी त्रस्त असणाऱ्या रुग्णांनी भाविकांनी या शिबिराचा लाभ घेतला.

''तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल बीडच्या वतीने घेण्यात आलेल्या या शिबिरात रुग्णांचा योग्य प्रकारे प्रतिसाद मिळाला या शिबिरामध्ये जिल्ह्यातील यांच्या हातून हजारो मणक्याच्या शस्त्रक्रिया अगदी यशस्वी पार पडलेल्या आहेत.असे मनका विकार तज्ञ डॉ बालाजी सूर्यभानराव नवले यांनी भाविकांसाठी रुग्ण सेवा दिली..! तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल नजर नाका,बीड येथे मान, मनका व अस्थिरोग संबंधी इतर काही समस्या असल्यास अवश्य भेट देण्याचे आवाहन तसेच भेटण्यासाठी संपर्क ७७७०००३२२९ ८६६८२१२३३१ या दूरध्वनीवर संपर्क साधण्याचे आवाहनही केले आहे.

cmyk




# इथेनॉल उत्पादन तंत्रज्ञानामुळे साखर कारखान्यांच्या नफ्यात वाढ - राजेश टोपे

पुणे : इथेनॉल उत्पादनाच्या प्रगत तंत्रज्ञानाविषयी सखोल माहिती घेत, विद्यमान यंत्रसामग्रीचा योग्य वापर करीत आणि धान्य आधारित तंत्रज्ञान स्वीकारून साखर कारखाने संपूर्ण वर्षभर कार्यरत राहू शकतात. इतकेच नव्हे तर यामुळे त्यांची कार्यक्षमता आणि नफा अशा दोहोंत देखील मोठी वाढ होऊ शकते, असे प्रतिपादन राज्याचे माजी सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्री राजेश टोपे यांनी केले.

प्राज इंडस्ट्रीजच्या वतीने पुण्यात नुकत्याच एका तांत्रिक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी राजेश टोपे बोलत होते. इथेनॉल डिस्टिलरीजमध्ये धान्य-आधारित ॲड-ऑन मॉड्यूल्सद्वारे इथेनॉल उत्पादन विस्तारासोबतच भारतातील इथेनॉल मिश्रणाच्या वाढत्या संधींवर आणि जैवइंधन क्षेत्रातील नवकल्पनांवर या कार्यशाळेत चर्चा करण्यात आली. प्राज इंडस्ट्रीजचे संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रमोद चौधरी, प्राजच्या



बायोएनर्जी विभागाचे अध्यक्ष अतुल मुळे, या उद्योगाशी संबंधी तज्ज्ञ, संस्था आणि विविध भागधारक या वेळी आवर्जून उपस्थित होते.

विद्यमान संसाधनांचा अधिक चांगल्या प्रकारे वापर करून धान्य-आधारित मॉड्यूल्सच्या जोडणीद्वारे इथेनॉल उत्पादन कसे वाढवता येईल, यावर या कार्यशाळेत विशेष भर देण्यात आला होता. राजेश टोपे म्हणाले, की कचऱ्यापासून उर्जानिर्मिती ही संकल्पना पुढारलेली असून यामुळे इथेनॉल उत्पादन वाढणार आहेच शिवाय साखर कारखान्यांची आर्थिक शाश्वतता देखील सुधारेल. नजीकच्या भविष्यात या संकल्पनेमुळे भारताच्या जैवइंधन उद्दिष्टांना गती मिळेल.

परंतु योग्य किमतीत कच्चा माल उपलब्ध होणेही या कार्यक्रमाच्या यशासाठी महत्त्वाचे ठरेल. डॉ. प्रमोद चौधरी म्हणाले, की ग्लोबल बायोफ्यूएल अलायन्समुळे नव्या संधी उपलब्ध होत असताना, भारतीय डिस्टिलरीज जागतिक जैवइंधन व्यापारातील प्रमुख भागीदार बनू शकतात. प्राजमध्ये, आम्ही शाश्वत उपाय शोधण्यात आणि भारताच्या ऊर्जा सुरक्षिततेला बळकट करण्यासाठी तसेच शेतकरी आणि उद्योगांसाठी आर्थिक संधी निर्माण करण्यासाठी पूर्णतः वचनबद्ध आहोत.

# आस्तरिकरण करुन उन्हाळ्यातही टिकवा शेततळ्यातील पाणी



टंचाईच्या काळात फळबागा वाचविण्यासाठी शेततळ्यातील पाण्याचा वापर केला जातो. बऱ्याच वेळा उन्हाळ्यापर्यंत शेततळ्याती पाणी टिकून राहत नाही. कारण शेतकरी शेततळे खोदल्यानंतर त्यामध्ये आस्तरिकरण करत नाहीत. अस्तरीकरणामुळे शेततळ्यात पाण्याचा सुरक्षित साठा उपलब्ध होतो. त्यामुळे शेततळ्यात आस्तरिकरण करणे गरजेचे आहे.

ज्या जमिनीत पाणी धरून ठेवण्याची क्षमता अत्यंत कमी आहे. तसच पाणी पाझरण्याचा वेगही प्रचंड आहे. त्या ठिकाणचे पूर्ण भरलेले शेततळे काही दिवसांत कोरडे होते. अशा शेततळ्यातून अपेक्षित फायदा होत नाही. अशा शेततततळ्यातील पाझर कमी करण्यासाठी शेततळ्यास अस्तरीकरण करावे. शेततळ्यातील पाणी जमिनीमध्ये मुरून वाया जाऊ नये.यासाठी विशेष प्रकारच्या ५०० मायक्रॉन दर्जाच्या प्लॅस्टिक फिल्मचा अस्तरीकरणासाठी वापर करावा. प्लॅस्टिकचे कापड शेततळ्यात पसरताना मुरमाची किंवा मातीची अणकुचीदार टोके वर येणार नाहीत याची काळजी घ्यावी. त्याकरिता सुक्या मातीचे किंवा वाळूचे थर पसरावेत. त्यावर प्लॅस्टिकचे कापड घड्या पडणार नाही या पद्धतीने टाकावे. अस्तरीकरणासाठी वापरण्यात येणारा प्लॅस्टिक कागद आयएसआय माणक प्रमाणे असावा. बांधापासून तळ्याच्या सर्व बाजूने १.५ बाय १.५ बाय १.५ चा चर खेदून घ्यावा. त्यात लायनिंग ची वरिल बाजू गाडून टाकता येते. याला ॲकरिंग म्हणतात. यामुळे लायनिंग ची हालचालयामुळे लायनिंग ची हालचाल होत नाही व ते जास्त काळ टिकण्यास मदत होते. शेततळयाला कुंपण घालणे अत्यावश्यक आहे. कुंपण नसल्यास वन्य प्राणी तलावात शिरण्याचा व अपघात होण्याचा धोका असतो.


खोदाई पूर्ण झाल्यावर शेततळ्यातील साफसफाई व प्लॅस्टिक फिल्म अस्तरीकरणास योग्य तळ,सर्व बाजू उतार व माथा इत्यादींचे ड्रेसिंग, फिनिशिंग करावे.

# जमिनीचा सेंद्रिय कर्ब आणि त्याचे महत्व

सेंद्रिय खतामध्ये कर्बाचे प्रमाण जवळपास ६० टक्के असते.. हा सेंद्रिय कर्ब जमिनीच्या वरच्या थरात असतो. जमिनीतील सुक्ष्मजीव हे सेंद्रिय घटकांमध्ये असलेली सर्व मूलद्रव्ये पिंकांच्या मुळांना उपलब्ध करून देत असतात. ज्या जमिनीमध्ये सेंद्रिय कर्बाच प्रमाण हे एक टक्क्यापेक्षाही कमी असत ती जमीन शेतीसाठी योग्य मानली जात नाही. तर जमिनीमधील सेंद्रिय कर्ब जेव्हा चार टक्के किंवा त्यापेक्षा जास्त असतो, तेव्हा जमिनीची सुपीकता चांगली असते. पिकाच्या वाढीसाठी आवश्यक असणारी मूलद्रव्ये चांगल्या कुजलेल्या सेंद्रिय खतामधून सहज उपलब्ध होतात.

सेंद्रिय कर्बाचे फायदे : सेंद्रिय कर्बामुळे जमिनीतील सूक्ष्मजीवांच प्रमाण वाढत. कारण जमिनीतील सूक्ष्मजीव हे कर्बावर आपली उपजीविका करत असतात. हे कर्ब त्यांना जमिनीतील अन्नद्रव्ये, पालापाचोळा, मृत वनस्पती आणि प्राणी यांच्या विघटनातून मिळते. याच बरोबर विघटनामधून सूक्ष्मजीव वनस्पतीसाठी आवश्यक मूलद्रव्ये देखील जमिनीमध्ये उपलब्ध करून देतात. अन्नद्रव्यांच्या उपलब्धतेसाठी वनस्पती जमिनीतील सूक्ष्म जिवांवर अवलंबून असतात. जमिनीतील सूक्ष्मजीव वाढल्यामुळे जमिनीतील खनिज द्रव्यांचं स्थिरीकरण वाढत. जमिनीतील अन्नद्रव्यांची धारणक्षमता वाढून त्यांना एकत्रित बांधून ठेवत. जमिनीतील अन्नद्रव्यांची स्थिरता वाढल्यामुळे जमिनीची विद्युत वाहकता सुधारते. त्यामुळे जमिनीचा सामू सुधारण्यासही मदत होते.

जमिनीतील कर्बाचं प्रमाण वाढण्यासाठी जमिनीमध्ये मिसळले जातात. या सेंद्रिय पदार्थांचे विघटन झाल्यानंतर ह्युमस आणि ह्युमिक ॲसिड तयार होतं. ह्यूमस जमिनीची सुपीकता वाढविते. त्यामुळे जमिनीचा पोत सुधारण्यास मदत करते. ह्युमसचे प्रमाण वाढल्यामुळे जमिनीमध्ये हवेची पोकळी वाढते. या पोकळीमुळे मुळांच्या वाढीसाठी पोषक वातावरण तयार होत. जमिनीचा पोत सुधारल्यामुळे जमिनीची पाणी धरून ठेवण्याची क्षमताही वाढते. जमिनीमधील कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण वाढतं. त्यामुळे पिकाची चांगली वाढ होते. पाण्याचा निचरा होऊन जमिनीची धूप कमी होण्यास मदत होते.आपण जी पिकाला रासायनिक खते देतो त्या खतांची उपलब्धता वाढून या खतांचा ऱ्हास कमी होतो. अशा प्रकारे या सर्व गोष्टी एकमेंकांवर अवलंबून आहेत. त्यामुळे आपल्या शेतीत रासायनिक खतांचा वापर कमी करुन सेंद्रिय खतांचा वापर वाढवण अत्यंत गरजेच आहे. सुपीक जमिनीमध्ये निसर्गाची निरोगी अन्नसाखळी अखंडित चालू असते. पण जेव्हा रासायनिक खते आणि कीटकनाशकांचा अमर्याद वापर होतो तेव्हा ही अन्नसाखळी तुटते आणि जमिनीमधील सेंद्रिय कर्बाचे प्रमाण कमी होऊ लागत. त्यामुळे सेंद्रिय कर्ब महत्वाचा मानला जातो.







### महत्वाच्या घटना

१८३८ : ’द ग्रेट वेस्टर्न’ हे वाफेचे इंजिन असलेले जहाज इंग्लंडमधील ब्रिस्टॉल येथून निघून पंधरा दिवसांनी न्यूयॉर्क येथे पोचले. अटलांटिक महासागर पार करणारी ही पहिली आगबोट.

१९११ : डच भौतिकशास्त्रज्ञ हाइक ओन्नेस यांनी अतिसंवाहकतेचा शोध लावला.

१९२१ : आचार्य विनोबा भावे यांनी पवनार आश्रमाची स्थापना वर्धा येथे केली.

१९२९ : भगतसिंग व बटुकेश्वर दत्त यांनी दिल्लीतील सेंट्रल असेंब्लीत बॉम्बस्फोट केला.

१९५० : भारत आणि पाकिस्तान यांच्या लियाकत-नेहरू करारावर स्वाक्षऱ्या.

१९९३ : मॅसेडोनियाचे प्रजासत्ताक संयुक्त राष्ट्रात सामील झाले

२००५ : पोप जॉन पॉल (दुसरे) यांच्या अंत्ययात्रेत अंदाजे ४० लाख लोक सहभागी झाले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१३३६ : तैमूरलंग - मंगोलियाचा राजा (मृत्यू: १४ फेब्रुवारी १४०५)

१९२२ : ’गायनाचार्य’ पं. भास्करबुवा बखले - ग्वाल्हेर घराण्याचे प्रतिभावान गायक, बालगंधर्व आणि मास्टर कृष्णराव यांचे गुरू, ’भारत गायन समाज’ या संस्थेचे संस्थापक (मृत्यू: १७ आक्टोबर १८६९)

१९२४ : शिवपुत्र सिद्धरामय्या कोमकलीमठ ऊर्फ ’कुमार गंधर्व’ (मृत्यू: १२ जानेवारी १९९२)

१९२८ : रणजित देसाई - नामवंत मराठी साहित्यिक, ’स्वामी’कार (मृत्यू: ६ मार्च १९९२)

१९३८ : कोफी अन्नान - संयुक्त राष्ट्रांचे चे ७ वे प्रधान सचिव

१९७९ : भारतीय गायक-गीतकार अमित त्रिवेदी यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८५७ : १८५७ च्या स्वातंत्र्यसंग्रामची सुरूवात करणारा मंगल पांडे याला फाशी देण्यात आले. चैत्र शु. १४ (जन्म: १९ जुलै १८२७)

१८९४ : बंकिमचंद्र चट्टोपाध्याय - बंगाली कादंबरीकार, कवी, लेखक आणि पत्रकार. त्यांनी लिहिलेल्या ’आनंदमठ’ या कादंबरीत ’वंदे मातरम’ हे गीत असून या गीताने स्वातंत्र्यलढ्यातील सहभागींना प्रेरणा मिळाली. (जन्म: २७ जून १८३८)

१८९४ : बंकिमचंद्र चट्टोपाध्याय, सुप्रसिध्द बंगाली साहित्यिक व ‘वंदे मातरम्’ या गीताचे रचनाकार.

१९०६ : अल्झायमरच्या आजाराने निदान झालेल्या पहिल्या व्यक्ती एग्स्टे डिटर यांचे निधन. (जन्म: १६ मे १८५०)

१९२२ : ’गायनाचार्य’ पं. भास्करबुवा बखले - अष्टपैलू व चतुरस्त्र शैलीचे ग्वाल्हेर घराण्याचे प्रतिभावान गायक, बालगंधर्व आणि मास्टर कृष्णराव यांचे गुरू, ’भारत गायन समाज’ या संस्थेचे संस्थापक (जन्म: १७ आक्टोबर १८६९)

१९५३ : वालचंद हिराचंद दोशी - उद्योगपती (जन्म: २३ नोव्हेंबर १८८२)

१९५८ : पाब्लो पिकासो - स्पॅनिश चित्रकार आणि शिल्पकार (जन्म: २५ आक्टोबर १८८१)

१९७४ : नटवर्य गोपाळ गोविंद ऊर्फ नानासाहेब फाटक - मर्दानी रुप, तिन्ही सप्तकांतुन सहजपणे फिरणारा आवाज या देणग्या लाभलेले व गंधर्वयुगाची स्मृती जागवणारे रंगभूमीवरील कलाकार (जन्म: २४ जून १८९९)

१९९९ : वसंत खानोलकर - कामगार नेते, समाजवादी चळवळीतील एक अग्रणी, नर्मदा बचाव आंदोलनाच्या मेधा पाटकर यांचे वडील.


२०१३ : मार्गारेट थॅचर - ब्रिटनच्या एकमेव महिला पंतप्रधान (जन्म: १३ आक्टोबर १९२५)

२०१५ : भारतीय पत्रकार आणि लेखक जयकानधन यांचे निधन. (जन्म: २४ एप्रिल १९३४).

# कोंबड्यांतील उष्णतेचा ताण कमी करण्यासाठी वनौषधी

उष्ण वातावरणामुळे जनावरे, कोंबड्यांमध्ये ताण निर्माण होतो त्यामुळे त्यांच्यापासून मिळणाऱ्या उत्पादनावरही परिणाम होतो. ज्यावेळी शरीर उष्णता उत्पादन आणि शरीरातील उष्णता कमी राखण्यास सक्षम नसते अशावेळी कोंबड्यांमध्ये उष्णतेमुळे ताण निर्माण होतो. कोंबड्यांतील ताणासाठी विविध घटक कारणीभूत ठरतात यापैकी उष्णतेचा ताण हा प्रमुख घटक आहे.

उष्णता जास्त वाढल्यामुळे कोंबड्या शरीराचे तापमान नियंत्रित करण्यासाठी शेडमध्ये वापरलेली गादी म्हणजेच जामिनावर अंथरलेले तूस बाजूला सरकवून जमिनीवर पंख पसरवून बसतात. तसंच कोंबड्या पाण्याचे पाइप, पाण्याच्या भांड्याजवळ बसुन आपल्या शरिराचं तापमान नियंत्रित करण्याचा प्रयत्न करतात. तापमान ३५ अंश सेल्सिअसच्या खाली असल्यास कोंबड्यांना उष्णतेचा ताण जस्त जाणवत नाही. पण तापमान जर ३५ अंश सेल्सिअसपेक्षा जास्त वाढतं तेंव्हा, शेडमध्ये भरपूर खेळती हवा असणं आवश्यक असतं. छत थंड ठेवण्याकरिता छतावर सुक्या चाऱ्याचे आच्छादन करावे. शक्य असल्यास छतावर व पडद्यावर दिवसातून ३ ते ४ वेळेस पाण्याची फवारणी करावी.



याशिवाय कोंबड्यांना सकाळी आणि संध्याकाळी अशा थंड वेळेत खाद्य द्यावं. दुपारच्या वेळात कोंबड्यांना खाद्य देऊ नये. कारण सकाळी कोंबड्यांच्या शरीरात उष्णता उत्पादन २० ते ७० टक्क्यांपेक्षा कमी असतं.खाद्याद्वारे निर्माण होणारी उष्णता थंड वेळेत दोन तासापर्यंत परिणाम दाखवते, तर वातावरणातील तापमान हे ३५ अंश सेल्सिअस किंवा अधिक असताना हा परिणाम १० तासापर्यंत असतो. म्हणजेच केवळ खाद्य थंड वेळेत दिले तरी कोंबड्यांतील ताण बऱ्याच प्रमाणात कमी करता येतो. कोंबड्यांची शारीरिक ऊर्जा एकदम न वाढता ती आवश्यक व संतुलित प्रमाणात सतत असणं आवश्यक आहे. अशावेळी प्रत्यक्ष कर्बोदकांऐवजी फॅटचा उपयोग खाद्यातून करावा. याकरिता कोंबड्यांच्या खाद्यामध्ये वनस्पती तेलाचा योग्य प्रमाणात वापर करावा. अशा प्रकारे उपाययोजना केल्यास कोंबड्यांना उष्णतेच्या ताणापासून वाचवता येते.

औषधी वनस्पतींचा वापर अत्यंत उपयुक्त : कोंबड्यांतील उष्णतेमुळे निर्माण होणारा ताण कमी करण्यासाठी औषधी वनस्पतींचा वापर अत्यंत उपयुक्त ठरतो. सर्वात महत्त्वाचे म्हणजे जीवनसत्त्वांचा पुरवठा होण्याकरिता आवळा आणि संत्री किंवा इतर लिंबूवर्गीय वनस्पतींचा वापर कोंबड्यांच्या खाद्यामध्ये मोठ्या प्रमाणात करावा. यासाठी संत्री किंवा लिंबू ३० ते ४० ग्रॅम प्रति १०० कोंबडी या प्रमाणात वापरावं. उष्णतेचा ताण कमी करण्याकरिता लिंबू किंवा संत्र्याची साल देखील उपयुक्त आहे.


औषधी वनस्पतींचा वापर :

अश्वगंधा,तुळस,मंजिष्ठा,शतावरी या औषधी वनस्पतींचा वापर देखील कोंबड्यांच्या आहारातून करावा. अश्वगंधा- ४ ग्रॅम, तुळस-४ ग्रॅम, मंजिष्ठा-४ ग्रॅम, शतावरी-५ ग्रॅम घेऊन या सर्व वनस्पती एकत्र करून खाद्यातून १०० कोंबड्यांसाठी वापराव्यात.

# ‘अविशान’ जातीच्या मेंढ्या वर्षातून ६ ते ८ कोकरांना देतात जन्म

मांस तसेच लोकर व्यवसाय करण्यासाठी देशात बहुतेकजण आता मेंढ्यापालन व्यवसायाकडे वळलेले आहेत. सर्वसामान्य शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात हा व्यवसाय लोकप्रिय होत आहे, कारण त्यात कमी खर्चात जास्त नफा मिळतो. तसेच मांसाबरोबरच लोकरीलाही बाजारात मोठी मागणी आहे. विशेष म्हणजे मेंढीपालनाला प्रोत्साहन देण्यासाठी विविध राज्यांतील सरकारे शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान देत आहेत. मात्र असे असतानाही केवळ सुधारितजातींची माहिती नसल्यामुळे बहुतेक मेंढीपालकांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे.

‘अविशान’ : ही मेंढ्यांची प्रगत जात असून त्याचे वजन खूप वेगाने वाढते. या जातीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे ते एकाच वेळी ३ ते ४ कोकरांना जन्म देते. त्याचबरोबर ‘अविशान’ जातीच्या मेंढ्या वर्षातून दोनदा गर्भधारणा करतात. म्हणजेच ती एका वर्षात ६ ते ८ मुलांना जन्म देऊ शकते. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी ‘अविशान’ जातीच्या मेंढ्या पाळल्यास त्यांना मोठा नफा मिळेल. ते मांस तसेच लोकर मोठ्या प्रमाणावर विकू शकतात.



अविशान मेंढ्यांचा इतिहास : अविशान मेंढ्यांचा क्लोन तयार करण्यासाठी शास्त्रज्ञांना खूप मेहनत घ्यावी लागली. १९९७ मध्ये पश्चिम बंगालमधील सुंदरबन येथून गारोल जातीच्या मेंढ्या आणण्यात आल्या. यानंतर मालपुरा येथील मेंढ्यांसह या जातीचा क्रॉसिंग करून क्लोन तयार करण्यात आला.

परंतु शास्त्रज्ञांना पूर्ण यश मिळाले नाही. कारण या मेंढ्यांच्या जातीचा मृत्यूदर जास्त होता. शिवाय दूध देण्याची क्षमताही कमी होती. यानंतर गुजरातच्या पाटणवाडी जातीच्या मेंढ्या मालपुरा येथील मेंढ्यांसह क्रॉस करण्यात आल्या. मग मेंढीची प्रगत जात ‘‘अविशान’’ जन्माला आली. हे सामान्य जातीच्या मेंढ्यांपेक्षा जास्त दूध देते. शिवाय, त्याची प्रजनन क्षमता देखील जास्त आहे. वर्षातून दोनदा गर्भधारणा होते.

केवळ ५ टक्के मृत्युदर ! : अविशान कोकरू इतर जातीच्या मेंढ्यांपेक्षा ३० टक्के वेगाने वाढतात. कोकरे जन्मानंतर लगेचच विक्रीसाठी तयार होतात, त्यामुळे शेतकऱ्यांना कमी खर्च येतो. सध्या उत्तर प्रदेश, आंध्र प्रदेश, राजस्थानसह अनेक राज्यांतील शेतकरी अविशान मेंढ्या मोठ्या प्रमाणावर पाळत आहेत. या मेंढ्यांच्या मृत्यूचे प्रमाण केवळ ५ टक्के आहे. मांसासाठी ३ महिन्यांचे कोकरू विकता शकता. एक कोकरू साधारणपणे २५०० रुपयांना विकले जाते. जर तुम्ही ५० मेंढ्यांसह अविशान शेती सुरू केली असेल तर तुम्ही एका वर्षात किमान २०० कोकरू विकू शकता.

# युसुफवडगांव येथे श्रीराम नवमी जन्मोत्सव सोहळ्यास भाविक भक्तांची अलोट गर्दी

## भाविकांनी भरलेल्या मानाच्या १२ गाड्या ओढल्या





युसूफवडगांव। प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसुफवडगांव येथे श्रीराम नवमी जन्मोत्सवस सोहळ्यास मोठ्या उत्साहात सुरुवात'' दशरथनंदन श्रीरामचंद्र महाराज की जय '' असा जयघोष करीत भाविकांनी भरलेल्या १२ गाड्या ओढण्याची परंपरा कायम ठेवली.

युसूफवडगांव येथे अतिशय प्राचीन राम मंदीरात प्रभू रामचंद्रासोबत सीता माता,लक्ष्मण,भरत,शत्रुघ्न,आणि मारुती या देवतांच्या पंचधातुच्या मुर्ती आहेत.मंदिरात चैत्रशुद्ध प्रतिपदेला घटस्थापना केल्यानंतर दशमीपर्यंत विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले,रामनवमी निमित्त पहाटे सर्व मुर्तींना अभिषेक घालून दुपारी प्रभुरामांची मुर्ती एका सजवलेल्या पाळण्यात ठेवण्यात आली.राममंदिरात श्रीधर महाराज रामदासी यांचे नार्दिय गुलालाचे किर्तन झाले.दुपारी बारा वाजेच्या सुमारास दशरथनंदन रामचंद्र महाराज की जय असा जयघोष करीत गुलाल पुष्प उधळून जन्मोत्सव साजरा करण्यात आला.त्यानंतर गावातून रामचंद्रांची पालखी मिरवणूक काढण्यात आली.मिरवणूक वेशीमध्ये आल्यावर १२ बैलगाड्या एकमेकांना बांधून भाविकांनी भरलेल्या या गाड्या ओढण्याचा कार्यक्रम झाला.गाड्या ओढण्याचा नेत्रदीपक सोहळा पाहण्यासाठी गावातील व परिसरातील हजारो नागरिकांनी गर्दी केली होती.यावर्षी मानाच्या गाड्या ओढण्याचा मान रामभक्त बन्सी देवकर यांना होता.

**भाविकांना महाप्रसादाचे वाटप :** केज तालुक्यातील युसुफवडगांव येथे सध्या श्रीराम नवमी जन्मोत्सव व भव्य यात्रा महोत्सव चालु असुन आज पहिल्या दिवशी रामजन्म सोहळ्यानंतर आलेल्या भाविक भक्तांना श्रीराम ग्रुप पुणे व श्री स्वामी समर्थ सेवा प्रतिष्ठानच्या वतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.युसुफवडगांव येथे ३५० ते ३७५ वर्ष पुरतान श्रीराम मंदिर असुन दरवर्षी येथे श्रीराम नवमीला जन्मोत्सव सोहळा व यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते.हा सोहळा पाहण्यासाठी व श्रीरामाचे दर्शन घेण्यासाठी आजुबाच्या पंचक्रोशीतुन व मोठ्या संख्येने बाहेर गावाहुन भाविक भक्त येतात हा श्रीराम नवमी जन्मोत्सव व यात्रा महोत्सव ३ दिवस चालतो त्यामध्ये विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.त्या अनुशंगाने गत वर्षापासुन श्रीराम नवमी अर्थात मंदिरात प्रभु श्रीरामचंद्र महाराज यांचा जन्मोत्सव सोहळा पार पडल्यानंतर श्री स्वामी समर्थ प्रतिष्ठान व श्रीराम ग्रुप पुणे यांच्या वतीने दर्शनासाठी येणाऱ्या भाविक भक्तांना महाप्रसादाचे वाटप करण्यात येते याही वर्षी दि.०६ एप्रिल रोजी रामजन्म सोहळ्यानंतर आलेल्या भाविक भक्तांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सरपंच महेश गायके,प्रा.बापुसाहेब भुसारी,कृषी सहाय्यक बाळासाहेब लामतुरे,विकास जाधव,अनिल निकम,अनंत जाधव,बाळासाहेब सपकाळ,अमोल थळकरी,छत्रुगन निकम,उमाकांत सौंदणे,दयानंद सातपुते,नवनाथ जाधव,भैय्या सावंत,संतोष इंगळे,सचिन जोगदंड व पत्रकार सचिन उजगरे यांनी परिश्रम घेतले

## संत कैकाडी महाराज यांची जयंती व रामनवमी उत्साहात साजरी



लिंबागणेश। प्रतिनिधी

मानवानो माणुसकीला जागा हा महामंत्र देणारे राष्ट्रसंत,महान तपस्वी संत राजाराम महाराज म्हणजेच कैकाडी महाराज यांची जयंती आणि रामनवमी आज दि.०६ रविवार रोजी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील ग्रामपंचायत कार्यालयात प्रभु रामचंद्र आणि कैकाडी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून श्रीफळ फोडून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी सरपंच बालासाहेब जाधव होते.कार्यक्रमाचे प्रस्तावित रमेश गायकवाड यांनी केले तर सुत्रसंचलन हरिओम क्षीरसागर यांनी केले. डॉ.गणेश ढवळे यांनी आभार मानले.

संत कैकाडी महाराज यांच्या जीवनकार्याची महती वर्णन करताना प्रा .लेनाजी गायकवाड यांनी '' संत कैकाडी कैकाडी ! ''दरारा आसमंती!! कुळ -विठुचे लावुन! खनिल्या विषमतेच्या भिंती!! कीर्तने ,प्रवचने, अंधश्रद्धा निर्मूलन, बालविवाह प्रतिबंध, अस्पृश्यता निर्मूलन याद्वारे समाज प्रबोधन करून सर्व जगाला एकात्मतेची शिकवण देणारे महान तपस्वी कैकाडी महाराज यांचा जन्म राम नवमीला इ.स.१९०७ मध्ये अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यातील मांडवगण या गावी झाला. राष्ट्रसंत श्री कैकाडी महाराजांनी आपल्या कारकिर्दीत कोणाकडूनही पैसे घेतले नाहीत. तसेच ते कपडेही फार कमी वापरायचे. साधी राहणे व कधीही अन्न वाया जाऊ देत नसत. तसेच कोणालाही पाया पडू देत नसत '' तुम्ही देव होऊ नका ,संत होऊ नका, तुम्ही फक्त माणस व्हा माणसं '' हा संदेश ते समाजाला देत होते. ''हे विश्वचि माझे घर ''अशी भावना निर्माण झाल्याने त्यांनी समाज परिवर्तनासाठी स्वतःचा देह झिजवला. त्यांनी संपूर्ण भारतभ्रमण केले त्यामुळे त्यांना कन्नड, तेलगू अशा भाषा येत होत्या. त्यांनी महाराष्ट्रासह अनेक प्रांतामध्ये जाऊन समाज प्रबोधन केले.पंढरपूर येथे मंदिर बांधण्यासाठी भाविकांकडून त्यांनी सहस्त्रकोटी नाम जप करून घेतला. कैकाडी मठ हे पंढरपूरचे आकर्षण आहे. भारताच्या ऐतिहासिक आणि प्राचीन काळामधील या मठात भारत माता मंदिर आहे. या मंदिरामध्ये स्वर्गलोक ,पृथ्वीलोक आणि पाताळ अशी या मठाची निर्मिती करण्यात आलेली आहे. माशाच्या तोंडाच्या तोंडासारखा मठाच्या प्रवेशद्वाराचा आकार तयार करण्यात आलेला आहे. विविध देवदैवतांच्या,संतांच्या, महापुरुषांच्या ,क्रांतिकारकांच्या मुर्त्या या ठिकाणी बसविण्यात आले आहेत.मठाचे सविस्तर वर्णन सांगितले. ह.भ.प.अनंतकाका मुळे यांनी मर्यादा पुरुषोत्तम प्रभु रामचंद्र यांच्या जीवनावर आधारित प्रवचन केले.यावेळी राजेभाऊ गिरे, ग्रामपंचायत सदस्य दामोदर थोरात, महादेव कुदळे, बाळकृष्ण थोरात,दादा गायकवाड, तुकाराम गायकवाड, संजय घोलप , अँड गणेश वाणी, संतोष भोसले, अंकुश गायकवाड, रामदास मुळे, श्रीराम वायभट, सुरेश ढवळे, सुरेश निर्मळ आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

# कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांना मानसोपचारासाठी येरवड्याला पाठवा

### वैद्यकीय उपचारासाठी मदतनिधी अजितदादांना पाठवणार -डॉ.गणेश ढवळे



लिंबागणेश। प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे शेतकऱ्यांबाबत वारंवार वादग्रस्त विधान करत असुन त्यांचे मानसिक संतुलन बिघडले असुन शेतक-यांना दिली जाणारी कर्जमाफी स्वतःच्या खिशातून देणार आहेत का?? त्यांचे मानसिक संतुलन बिघडले असुन त्यांना मानसोपचारासाठी पुणे येथील येरवडा याठिकाणी भरती करण्यात यावे अशी मागणी करत बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील शेतकऱ्यांनी उपचारासाठी लागणारा वैद्यकीय मदतनिधी गोळा करून राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना पाठवणार असल्याचे डॉ.गणेश ढवळे यांनी म्हटले आहे.

कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी पाठीमागे हल्ली भिकारी देखील एक रुपया घेत नाही.आम्ही शेतकऱ्यांसाठी एक रूपयात पिक विमा योजना लागू केली आहे असे वादग्रस्त वक्तव्य केले होते याविषयी शेतकऱ्यांनी तिव्र नाराजी व्यक्त केली होती. त्यानंतर दोन दिवसांपूर्वी अवकाळी पावसामुळे फळबागांची पाहणी करताना कर्जमाफीच्या मुद्यावरून शेतकऱ्यांना कर्ज घ्यायचे आणि ५ ते १० वर्ष कर्जमाफी व्हायची वाट पहायची.तोपर्यंत कर्ज भरायचे नाही . तसेच कर्जमाफी झाल्यानंतर तुम्हाला पैसे येतात.त्या पैशाचं तुम्ही काय करता? त्या पैशातून शेतीमध्ये एक रुपयाची तरी गुंतवणूक आहे का? शेतकरी म्हणतात की कर्जमाफी करा आणि त्यातुन साखरपुडे,लग्न करतात. या असंवेदनशील वक्तव्याचा सर्वत्र निषेध व्यक्त करण्यात येत असुन कृषीमंत्री कर्जमाफी स्वतःच्या खिशातून करतात का? वारंवार शेतकऱ्यांविषयी बरळत असतात.त्यांचे मानसिक संतुलन बिघडले असुन त्यांना येरवड्याला भरती करा. वैद्यकीय उपचारासाठी आम्ही निधी गोळा करू असे म्हणण तिव्र संताप व्यक्त केला आहे.

## मराठवाडा जनता विकास परिषदेची बीड जिल्हा कार्यकारिणी जाहीर

माजलगाव। प्रतिनिधी

मराठवाडा जनता विकास परिषदेची बीड जिल्हा कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून बीड जिल्हा अध्यक्ष पदी राजेंद्र आगवन तर सचिव पदी सुमंत गायकवाड यांची निवड करण्यात आली आहे राजेंद्र आगवन यांच्या निवास स्थानी दिनांक ०५ एप्रिल शनिवार रोजी बीड येथे बैठक घेण्यात आली मराठवाडा जनता विकास परिषदेचे प्रमुख मार्गदर्शक माजी शिक्षक आमदार डी.के.देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

या बैठकीत सर्वानुमते खालील प्रमाणे बीड जिल्हा शाखेची कार्यकारिणी निवडण्यात आली प्रमुख मार्गदर्शक तथा केंद्रीय सदस्य पदी माजी शिक्षक आमदार डी.के. देशमुख ,प्रा.डॉ.डी.एच.थोरातअध्यक्ष राजेंद्र आगवन उपाध्यक्ष शिरीष देशमुख सचिव सुमंत गायकवाड कोषाध्यक्ष अतुल कुलकर्णी सदस्य प्रा. डॉ.हरिदास विधाते,गणपत सौंदळे, सौ.मयुरी राजहंस, गिन्यानदेव गदळे, विशाल जाजू तर अभ्यास गट प्रमुख संतोष मुळी सदस्य अनिल महाजन,सौ.मनिषा शितोळे,प्रदीप जोशी बैठकीचे संचालन सचिव सुमंत गायकवाड यांनी केले प्रमुख मार्गदर्शक माजी शिक्षक आमदार डी.के.देशमुख यांच्या मार्गदर्शना नंतर अतुल कुलकर्णी यांच्या आभाराने बैठकीची सांगता झाली

## भिम गीतांनी पेटविल्या क्रांतीच्या मशाली

### जयभिम महोत्सवात संगीत रजनीला प्रतिसाद



बीड। प्रतिनिधी

मानवाला मानवाचे अधिकार मिळवून देणारे महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती विश्वातल्या अनेक देशात साजरी होते. त्या अनुषंगाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त शनिवार (दि.५) एप्रिल रोजी लढा बा भिमाचा संगीत रजनी कार्यक्रमास उपस्थित जनतेने भरभरुन दाद दिली.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त बीड शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे ४ एप्रिल ते १४ एप्रिल या कालावधीत जयभिम महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या जयभिम महोत्सवात शनिवार (दि.५) एप्रिल रोजी प्रा.दिपक जमदाडे,अॅड. नितीन वाघमारे यांचा 'लढा बा भिमाचा संगीत रजनी कार्यक्रम झाला. या कार्यक्रमाचे उदघाटक म्हणून जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष अॅड.रोहिदास येवले तर प्रमुख पाहुणे म्हणून अॅड.अविनाश गडगे आदी उपस्थित होते. या भिमगित कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महादेव इनकर यांनी तर आभार विश्वमाला इनकर यांनी मानले. हा संगीत रजनी कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने मोलाचे परिश्रम घेतले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे,सोमवार दि.७ रोजी सकाळी ११ ते ५ महापुरुष वक्तृत्व स्पर्धा, सायं ६ वाजता मडऑक आणि लढा क्रांतीचा नाटक होणार आहे.

## माजलगावात राजस्थानी समाज महिलांच्या वतीने गणगौरची मिरवणूक

माजलगाव

येथील राजस्थानी समाज महिलांच्या वतीने दि ०६ एप्रिल रविवार रोजी गणगौर उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते,गणगौरव उत्सावा निम्मीताने गुणगौरव मिरवणूक वाजत-गाजत काढण्यात आली.

माजलगाव शहरातील राजस्थानी समाजातील महिलांनी गणगौरव उत्सावा निम्मीताने गणगौरव मिरवणूक जुना मोंढ्यातील गणपती मंदिर येथुन सुरुवात करण्यात आली.गणपती मंदिर येथे गौरचे गाण्यावर राजसस्थानी महिलांनी नृत्य व फुगडी खेळून आनंद साजरा केला.या गणगौरव मिरवणूकीत माहेश्वारी महिला मंडळांच्या अध्यक्षा माया चांडक व सचिव सरोज तोष्णीवाल व सर्व महिला पदाधिकार्यांचे सहकार्य लाभले.



## महात्मा फुले युवा दल पाटोदा तालुका प्रमुखपदी गणेश मोहळकर



पाटोदा। प्रतिनिधी

महात्मा फुले युवा दल पाटोदा तालुका प्रमुखपदी गणेश मोहळकर यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीमुळे दलाच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

गणेश मोहळकर यांची निवड महात्मा फुले युवा दलाच्या आगामी कार्यप्रणाली आणि समाजसुधारणेच्या दृष्टीने महत्वाची ठरणार आहे. महात्मा फुले युवा दलाचे उद्दिष्ट समाजातील दुर्बल आणि शोषित वर्गाच्या हक्कांसाठी आवाज उठवणे, तसेच सामाजिक न्यायासाठी कार्य करणे आहे.गणेश मोहळकर यांची निवड पाटोदा तालुक्यातील माळी समाजाच्या हक्कांसाठी लढा देणाऱ्या दलाच्या कामगिरीला नव्या दिशा देईल,अशी आशा कार्यकर्त्यांनी व्यक्त केली आहे.या निवडीवर दलाचे सदस्य,सामाजिक कार्यकर्ते आणि पाटोदा तालुक्यातील इतर नेत्यांनी गणेश मोहळकर यांना शुभेच्छा दिल्या आणि त्यांच्या कार्यक्षम नेतृत्वाची अपेक्षा व्यक्त केली. गणेश मोहळकर यांनी या निवडीवर खुशी व्यक्त करत, समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि माळी समाजाच्या हक्कांसाठी पूर्णपणे समर्पित राहण्याचे आश्वासन दिले.

# सामाजिक एकोपा जोपासण्यासाठी रिपाइंचा ईद ए-मिलाफ

बीड । प्रतिनिधी

हिंदू-मुस्लिमांच्या ऐक्याचे प्रतिक असलेल्या पवित्र रमजान ईदचे औचित्य साधून हिंदू-मुस्लिम भाईचारा वाढविण्यासाठी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी हिंदू-मुस्लिम समाज बांधवांना ईदच्या शुभेच्छा देण्यासाठी व सामाजिक एकोपा जोपासण्यासाठी बीड शहर रिपाइंच्या वतीने बशीरगंज चौक बीड येथे रविवार (दि.६) एप्रिल २०२५ रोजी हजारो हिंदू-मुस्लिम बांधवांच्या उपस्थितीत ईद ए-मिलाफ कार्यक्रम संपन्न झाला. भारताची एकात्मता व देशातील सर्व धर्मीय भाईचारा व बंधुता टिकून ठेवण्यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समता, स्वातंत्र्य व बंधुताचा संदेश देत भारत एक संघ ठेवण्याचे महान कार्य केले. सामाजिक एकोपा जोपासण्यासाठी व हिंदू-मुस्लिम भाईचारा वाढविण्यासाठी गेल्या चौदा वर्षापासून रिपाइंच्या वतीने केले जात आहे. आगामी काळातही समता, स्वातंत्र्य,बंधुता व एकोपा जोपासण्यासाठी सर्व धर्मीयांना सोबत घेऊन ईद ए-मिलाफच्या माध्यमातून सुरू राहणार आहे.




रिपाइंच्या वतीने युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांनी आयोजित केलेल्या ईद-ए-मिलाफच्या कार्यक्रमास माजी आ.राजेंद्र जगताप, जनार्धन तुपे, मोईन मास्तर, सय्यद सलीम,आ. विजयसिंह पंडित, डॉ.योगेश क्षीरसागर, सुशीलाताई मोराळे, तय्यबभाई, जावेद कुरेशी, फारूक पटेल, ऍड.बाळासाहेब राख, उल्हास गिराम, बीड तहसीलदार चंद्रकांत शेळके, पोलीस उपविभागीय अधिकारी विश्वंभर गोल्डे, अशोक लोढा, अमृत सारडा, नवनाथ शिराळे, शेख शफिक भाऊ, चंद्रकांत नवले, अशोक हिंगे, रंजित क्षीरसागर, शेख इकबाल, जलील पठाण,अॅड.सय्यद यासेर पटेल,बबन वडमारे, गोपाळ धांडे, विष्णू वाघमारे, सुहास पाटील, डॉ.सतिष साळुंके, डॉ.लक्ष्मण जाधव, अॅड.सुभाष राऊत, सुनिल क्षीरसागर, वैभव स्वामी, दिनेश लिंबेकर, जयतुला खान, सादेक जमा, गणेश वाघमारे,किशोर कांडेकर, अविनाश जावळे, अशोक साळवे, अरुण निकाळजे, सादेक कुरेशी, लक्ष्मण सिरसट, धोंडीराम सिरसट,दीपक कांबळे, दशरथ सोनवणे, प्रमोद दासूद, गौतम बचुटे, संदीपान डोंगरे, बापू पवार, शाहू डोळस, गोवर्धन वाघमारे, महेश आठवले, मायाताई मिसळे, रेश्माताई जोगदंड, अरुणाताई आठवले, नाना मस्के, अविनाश जोगदंड, भैय्यासाहेब मस्के, सुभाष तांगडे, प्रभाकर चांदणे, सतिष शिनगारे, धम्मा पारवेकर, नामदेव वाघमारे, शाम वीर, भैय्यासाहेब साळवे,अक्षय कोकाटे, भाऊसाहेब दळवी, अॅड.श्रीकांत साबळे, महेंद्र वडमारे, सचिन वडमारे, यांच्यासह विविध पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राजू जोगदंड, मझरखान, रमेश गंगाधरे, सय्यद जफर, सादेक पठाण किसन तांगडे, रफिक भाई फिटर, शेख रोहिल रफीख, सुलतान बाबा, सिद्धीक फारुखी, फरहान बागवान, रणजीत शिनगारे आदींनी परिश्रम घेतले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अॅड.सुरेश वडमारे यांनी केले.

## गजानन बँकेला एक कोटी तीस लाखाचा नफा

बीड । प्रतिनिधी

सर्वांना आपलं मानणारी आपली बँक या दृढ विश्वासाने २०८ कोटी ३५ लाख ४५ हजार व्यवसाय असलेल्या श्री गजानन नागरी सहकारी बँकेला मार्च २०२५ अखेर नेट नफा एक कोटी तीस लाख ७४ हजाराचा झाला आहे. अशी माहिती बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम. आर. क्षीरसागर व सरव्यवस्थापक डॉ.शेख एम. एस. यांनी दिली आहे.

बँकेचे अध्यक्ष तथा माजी मंत्री जयदत्त सोनाजीराव क्षीरसागर यांचे नियोजनबद्ध निर्णय व अभ्यासू मार्गदर्शन लाभले आहे तसेच बँकेचे उपाध्यक्ष जगदीश काळे व संचालक मंडळाचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. बँकेची ३१ मार्च २०२५ वरील वित्तीय स्थितीमध्ये बँकेचे भाग भांडवल पाच कोटी दहा लाख ६६ हजार, राखीव व इतर निधी १८ कोटी १९ लाख ६६ हजार, नेटवर्थ १९ कोटी ६० लाख ५६ हजार, ठेवी १२७ कोटी ५५ लाख ४० हजार, कर्जे ८० कोटी ८८ लाख पाच हजार, गुंतवणूक ४६ कोटी ४८ लाख ६१ हजार, सीडी रेशो ६३.४१ %, ग्रॉस एनपीए ३.०५%, नेट एनपीए ० %, भांडवल प्राप्त रेशो २६.५२% आहे. बँक रिझर्व बँकेचे सर्व नॉर्म्स पूर्ण करत आहे. बँकेचे अध्यक्ष माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर व उपाध्यक्ष जगदीश काळे व संचालक मंडळ यांनी स्थितीबाबत समाधान व्यक्त करून मुख्य कार्यकारी अधिकारी एम. आर. क्षीरसागर, सरव्यवस्थापक डॉ.एम. एस. शेख, व्यवस्थापक विलास कुंबेफळकर, वसुली अधिकारी लांडे के. ए. व कर्मचारी वर्ग यांनी ठेवीचे व कर्जाचे दिलेले टारगेट पूर्ण केल्यामुळे कौतुक केले आहे.

# भाजपाचा स्थापना दिन परळीत उत्साहात साजरा

## ना.पंकजाताई मुंडे यांच्या संपर्क कार्यालयासमोर झेंडावंदन; कार्यकर्त्यांनी पेढे वाटून केला आनंदोत्सव

परळी । प्रतिनिधी

**भारतीय जनता पार्टीचा स्थापना दिवस शहरात आज उत्साहात साजरा करण्यात आला. राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या कार्यालयासमोर कार्यकर्त्यांनी झेंडावंदन करून तसेच फटाके फोडून आनंदोत्सव साजरा केला.**

६ एप्रिल भाजपाचा आजचा स्थापना दिवस ना. पंकजाताई मुंडे यांच्या अरुणोदय मार्केटमधील संपर्क कार्यालयात अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. स्थापना दिनानिमित्त भाजपचे तालुकाध्यक्ष सतीश मुंडे, शहराध्यक्ष जुगलकिशोर लोहिया यांच्या हस्ते भाजपच्या ध्वजाचे झेंडावंदन करण्यात आले. तत्पूर्वी ज्येष्ठ नेते शामाप्रसाद मुखर्जी, दीनदयाळ उपाध्याय, अटलबिहारी वाजपेयी, लोकनेते गोपीनाथराव मुंडे, प्रमोद महाजन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून वंदन

### ना. पंकजाताई मुंडे यांचा मुंबईत कार्यकर्त्यांशी संवाद व आरोग्य शिबीराला भेट

भाजपच्या स्थापना दिनानिमित्त मुंबईतील माहीम विधानसभा मतदारसंघात आयोजित मोफत आरोग्य तपासणी शिबीराला ना. पंकजाताई मुंडे यांनी भेट देऊन याठिकाणी उपस्थित पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांशी संवाद साधला. तसेच महिला उद्योजिकांकरिता लावण्यात आलेल्या विनामूल्य स्टॉल्सशी पाहणी केली. स्थापना दिनानिमित्त लोकोपयोगी उपक्रम राबविल्याबद्दल आयोजकांचे कौतुक करून त्यांना शुभेच्छा दिल्या तसेच याप्रसंगी मुख्यमंत्री मा.देवेंद्रजी फडणवीस यांच्या मार्गदर्शनाचा त्यांनी कार्यकर्त्यांसमवेत लाभ घेतला.






करण्यात आले. यावेळी कार्यकर्त्यांनी फटाके फोडून व पेढे वाटून एकमेकांना स्थापना दिवसाच्या शुभेच्छा दिल्या. दुपारी २ वा. कार्यालयात संघटन पर्व अंतर्गत मोठा स्क्रीन लावून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच भाजपच्या ज्येष्ठ नेत्यांच्या मार्गदर्शनाचा कार्यकर्त्यांनी लाभ घेतला. यावेळी सतीश मुंडे, जुगलकिशोर लोहिया यांच्यासह प्रकाश जोशी, राजेश्वर देशमुख, महादेव इटके, राजेंद्र ओझा, नितीन समशेट्टे, मोहन जोशी, अनिश अग्रवाल, बंडू कोरे,अच्युत जोगदंड, चंदाताई ठोंबरे, राजेश कौलवार, सुशील हरंगुळे, अभिमान मस्के, विकास हालगे, मिलिंद कांबळे आदींसह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# भगवंताचा अवतार हा भक्तांच्या कल्याणासाठी -ह.भ.प.श्रीहरि पुरी महाराज

आष्टी । प्रतिनिधी

अखंड ब्रह्मंडांच्या नायकाचे चिंतन आणि मनन हे मानवी जीवनाचे साध्य असते. भगवंताच्या सानिध्यातील मिळणारा आनंद हा वैश्विक, शाश्वत व चिरंतन असतो किंबहुना वृक्षाची पाने हाले ज्याची सत्ता राहिले अहंता मग कोठे ? देव बघायचा नव्हे,तर अनुभवण्याची बाब आहे असे सांगून सत्य अहिंसा समता बंधुत्व ऐक्य आणि सर्व धर्म सम भाव या मूल्यांची सदैव गरज असते. भगवंताचा अवतार हा भक्तांच्या कल्याणासाठीच असतो असे प्रतिपादन ह.भ.प. श्रीहरि पुरी महाराज यांनी केले.

आष्टी येथील श्रीराम मंदीरात रामनवमीनिमित्त आयोजित रामनवमी महोत्सवात राम जन्मोत्सवाचे कीर्तन सेवेप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आ.सुरेश धस,राजेंद्र धोंडे, गाणगापूरचे ह.भ.प.यशवंत गिरीजी महाराज, ह.भ.प.दिनकरराव तांदळे,ह.भ.प.





रामदास डोरले महाराज,ह.भ.प. पोकळे महाराज, माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे, खंडुदादा जाधव, निळकंठ खेडकर, संग्राम गळगटे,ॲड. बाबुराव अनारसे, अशोक डोके सर, जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे,संजयशेठ मेहेर,माजी नगराध्यक्ष भारत मुरकुटे,माजी नगरसेवक प्रविण कदम,शहराध्यक्ष बाबु कदम,सुरेश गोरे,भाऊसाहेब कोकणे,सुभाष बोरुडे,लाला महाराज राक्षे, शिवदास केरुळकर, अनंत देवा जोशी, अनिल बिवरे देवा, किसनराव रासकर, बाळासाहेब सोले, प्रा.काकासाहेब सोले,शाहुराव लाड, आबा गांगर्डे आदि सामाजिक, राजकीय,धार्मिक,व्यापार क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

ह.भ.प.श्रीहरि पुरी महाराज यांनी मराठवाड्याच्या कानाकोपऱ्यात कीर्तन सेवेच्या माध्यमातून समाज प्रबोधनाचा तेजस्वी दीपस्तंभ आपल्या वाणीतून निर्माण केला आहे. व्यवहारिक जीवनात शांतता महत्त्वाची असल्याचे सांगून वाणी अत्यंत रसाळ असलेल्या पुरी महाराजांनी जीवनात पाच भाग्य असावीत असे सांगितले. मानवी देहाने स्वयंस्फूर्त भक्ती करायला मिळावी, सज्जनपणा,नम्रतां अंगी यावी,दान देण्याची सवय असावी,दाता व्हावे.परोपकारी व्हावे या मूल्यांना विशेष स्थान देत मानवी जीवनातील सुखाची देवाची सुद्धा इच्छा असते असे त्यांनी सांगितले.देवाच्या नामस्मरणात मानवी देहाचे सुख असल्याचे त्यांनी ठासून सांगितले. श्रीराम नवमीच्या निमित्ताने पुरी महाराजांची किर्तन सेवा रामाच्या मूल्यात्मक जीवनाच्या अनुषंगाने विविध दृष्टांतातून मार्गदर्शनात्मक सेवा घडणार आहे. दरम्यान,आजच्या स्थितीतसुद्धा केवळ प्रबोधनाचा ध्यास मनी घेऊन सर्वसामान्य गोरगरीब, दीनदलित, दुबळ्या, अनाथ,अपंग, शेतकरी, शेतमजूर आणि वंचित घटकांसह शिक्षण आणि संस्काराचा मंत्र देणारे ह.भ.प. श्रीहरी पुरी महाराज यांचा सत्कार संयोजन समीतीचेवतीने करण्यात आला.

# लक्ष्मण आण्णांच्या मार्गदर्शनखाली शिवराज पवारांच्या उपस्थितीत गेवराईत भाजपा स्थापनादिन उत्साहात साजरा

गेवराई । प्रतिनिधी

देशातील सर्वात मोठा पक्ष म्हणून भारतीय जनता पक्षाला मतदारांनी पसंती दिले आहे त्या भारतीय जनता पक्षाचा आज ६ एप्रिल रविवार रोजी स्थापनादिन देशभरात व महाराष्ट्रात मोठ्या उत्साहात साजरा होत असून भाजपा प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावणकुळे,कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण, ना.पंकजाताई मुंडे मा.आ.लक्ष्मण आण्णा पवार यांच्या मार्गदर्शनात गेवराई मतदारसंघातील मा.आ.लक्ष्मण पवार यांच्या मार्गदर्शनाखाली युवानेते शिवराज पवार यांच्या उपस्थितीत गेवराई येथील कोल्हेररोड वरील भारतीय जनता पक्षाच्या संपर्क कार्यालयात साजरा करण्यात आला

यावेळेस मा.नगराध्यक्ष ब्रम्हदेव




धुरंधरे,मा.उपनगराध्यक्ष राजेंद्र राक्षसभुवनकर, दादासाहेब गिरी,मा.सभापती भरत गायकवाड, आप्पासाहेब कानगुडे,राम पवार, किशोर धोडलकर, बद्दोदिन, लक्ष्मण चव्हाण, पिटु साळवे.दिलीप सोनवणे,शिवाजी काळे,बाबुराव गवारे, रजित खाजेकर, रजित कांबळे, गोरख मोटे,प्रमेश्वर राठोड,प्रल्हाद येळापुरे, दाउद पठाण,दिपक पवार, अमोल हादगुले,शेख बाबा.मगन परदेशी, भगवान कदम,कृष्णा पाटोळे, बालाजी जाधव, बबन जाधव, आदी उपस्थित होते. राष्ट्र प्रथम या भावनेने सुशासन आणी जनकल्याणासाठी समर्पित भारतीय जनता पक्षाचा झेंडा हा माझा अभिमान आणि प्रेरणा आज गेवराई शहरातील कोल्हेर रोड वरील भारतीय जनता पक्षाच्या संपर्क कार्यालयात विविध कार्यक्रमाचे आयोजन युवानेते शिवराज पवार यांच्या उपस्थितीत केले होते.

# जय श्रीरामाच्या जय घोषाने परिसर दुमदुमला

गेवराई । प्रतिनीधी

श्री राम नवमी निमीत्त शहरातील राम मंदिरात श्रीराम जन्म उत्सव मोठ्या थाटात साजरा करण्यात आला. यावेळी असंख्य भावीक भक्तानी दर्शनासाठी गर्दी केली होती.

देशभरात श्री रामनवमी निमीत्त राम जन्म उत्सव मोठ्या थाटात साजरा करण्यात येतो.त्याच प्रमाणे गेवराई शहरातील राम मंदिर संस्थानच्या वतीने श्री राम जन्म उत्सवाची जय्यत तयारी करण्यात आली होती.श्रीराम नवमी निमित्त मंदिरात श्रीमद भागवत कथेचे आयोजन करण्यात आले होते. कथाकार मुकुंद महाराज गोंदिकर यांच्या सुमधुर वाणीतुन कथा श्रवणाचा भाविकांनी लाभ घेतला.रोज सायंकाळी ख्यातनाम किर्तन



कराच्या किर्तनाचे व भजनाचे आयोजन करण्यात आले होते. संस्थानचे पुजारी अनंत रामदासी व श्रीपाद रामदासी यांनी श्रीराम जन्म उत्सवाची जय्यत तयारी केली होती.श्रीराम नवमी च्या दिवशी पांडुरंग शास्त्री गव्हाणे आळंदीकर यांनी श्रीराम जन्मा बद्दल माहिती सांगीतली. रविवार रोजी १२ वाजता जन्म उत्सव साजरा करण्यात आला. यावेळी आमदार विजयसिंह पंडीत, युवानेते शिवराज पवार हे उपस्थित होते.यावेळी संस्थानच्या वतीने सत्कार करण्यात आला.


# बीडमध्ये फुले आंबेडकर युवक सभा

## उपस्थित राहण्याचे अनिल डोंगरेंचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

बीडमध्ये फुले आंबेडकर युवक सभेकडून, फुले आंबेडकरी चळवळ समजून घेऊया या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे.हा परिसंवाद बीड शहरातील छत्रपती राजर्षी शाहू महाराज स्पर्धा परीक्षा केंद्र येथे मंगळवार (दि.८) रोजी सायंकाळी ५ वाजता होणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे माजी जिल्हाध्यक्ष अनिल डोंगरे यांनी केले आहे.

प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हंटले आहे की, फुले



आंबेडकरी चळवळ समजून घेऊया या कार्यक्रमास मार्गदर्शक म्हणून विचारवंत गौतमीपुत्र कांबळे, उदघाटक म्हणून माजलगाव विभागाचे एसडीएम गौरव इंगोले, तर अध्यक्षस्थानी डॉ.विक्रम धन्वे असणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस निरीक्षक अमन शिरसाट, डॉ.मनोहर शिरसाठ, राजर्षी शाहू महाराज स्पर्धा परीक्षा केंद्राचे संचालक राहुल वाघमारे यांची उपस्थिती असणार आहे.

आज सध्या स्थितीत फुले आंबेडकरी चळवळ समजून घेणे, अतिशय महत्वाचे होत चालले आहे. त्यामुळे फुले आंबेडकरी चळवळ समजून घेऊया या विषयावर परिसंवादाचे आयोजित केला आहे. या परिसंवादास वंचित बहुजन आघाडीचे माजी जिल्हाध्यक्ष तथा मुख्य संयोजक अनिल डोंगरे यांच्यासह डॉ.बाळासाहेब जावळे, ॲड. राजेश शिंदे, ॲड. तेजस वडमारे यांनी केले आहे.

### आज जिल्हास्तरीय लोकशाही दिन

बीड । प्रतिनिधी

जिल्हास्तरावर दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात जिल्हास्तरीय लोकशाही दिन साजरा होतो. माहे एप्रिल २०२५ चा लोकशाही दिन सोमवार दि.७ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात दु.१ ते २ वा. या वेळेत होणार आहे.

लोकशाही दिनाकरिता नागरिकांनी प्रथम तालुका लोकशाही दिनात अर्ज सादर करणे बंधनकारक आहे. तालुका लोकशाही दिनातील उत्तराने समाधान न झाल्यास जिल्हास्तरीय लोकशाही दिनात अर्जदार अर्ज सादर करु शकतात, असे प्रशासनाने कळविले आहे.

# महापुरुष सामान्य ज्ञान स्पर्धेला प्रतिसाद


## जयभिम महोत्सव: शेकडो विद्यार्थ्यांनी घेतला सहभाग

बीड । प्रतिनिधी

राज्याला आदर्श घालून दिलेल्या बीड जयभिम महोत्सवात महापुरुष सामान्य ज्ञान स्पर्धा पार पडली.या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त सहभाग नोंदवला. या स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळाला. स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने सुयोग्य नियोजन केले होते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त बीडमध्ये ४ एप्रिल ते १४ एप्रिल या कालवधीत जयभिम महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवात रविवार (दि.६) एप्रिल रोजी तुलसी





महाविद्यालयात महापुरुष सामान्य ज्ञान स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद नोंदवला होता.

महापुरुष सामान्य ज्ञान परीक्षेला अध्यक्ष म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे प्रमुख गौतम चोपडे, प्रमुख पाहुणे म्हणून तुलसी महाविद्यालयाचे प्राचार्य देविदास निकाळजे, सुमेध जोगदंड, डॉ.विनोद किर्दत आदी उपस्थित होते.या स्पर्धेचे प्रस्ताविक प्रा.अशोक गायकवाड, सूत्रसंचालन ॲड.राजेश शिंदे, आभार सचिन वडमारे यांनी केले.

स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने सुयोग्य नियोजन केले होते.जयभिम महोत्सवातील कार्यक्रमांना नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने केले आहे.

### एक हजार विद्यार्थी बसले होते परिक्षेस

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीकडून गुरुवार (दि.३) एप्रिल रोजी महापुरुष सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षा तालुका पातळीवर घेण्यात आली होती. त्या परीक्षेला एकूण एक हजार विद्यार्थी बसले होते. त्यामध्ये उत्तीर्ण विद्यार्थ्यांची अंतिम परीक्षा बीड शहरातील तुलसी महाविद्यालय येथे रविवार (दि.६) एप्रिल रोजी पार पडली त्यामध्ये शेकडो विद्यार्थी परीक्षेस बसले होते.



# श्री रामनवमी निमित्त अभाविप आयोजित दंत तपासणी शिबिर

**बीड । प्रतिनिधी**

श्री रामनवमीचे औचित्य साधुन अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, बीड व मेडीव्हिजन यांच्या संयुक्त विद्यमाने आज श्री क्षेत्र रामगड येथे दंत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते या आरोग्य तपासणी शिबिर उद्घाटन प्रसंगी श्री. क्षेत्र रामगडाचे मठाधिपती ह.भ.प स्वामी योगीराज महाराज, प्रदेश सहमंत्री स्वप्निल बगाडे यांच्या हस्ते करण्यात आले. सर्व भाविक-भक्तांनी दंत आरोग्याचे महत्त्व लक्षात घेत व मोफत शिबिराचा लाभ घेतला. दंत आरोग्याची नागरिकांमध्ये जागृती व्हावी यासाठी अभाविप व मेडिव्हिजन वतीने शिबिराचे आयोजन करण्यात आले, या शिबिरात १४२ नागरिकांनी दंत तपासणी शिबिराचा लाभ घेतला. यावेळी अभाविप बीड शहर सहमंत्री आशिष वारे, शिबिर प्रमुख अजिंक्य सोळुंके, सहप्रमुख अक्षय मुंडे, राघवेंद्र कुलकर्णी, हर्षद राजेपुरे, डॉ.गणेश जायभाय, डॉ. आशिष साबळे डॉ. मयुर अवचार व आदी अभाविप कार्यकर्ते व विद्यार्थी उपस्थित होते.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# मंगेशकर रुग्णालय प्रकरण! मेधा कुलकर्णींचं भाजप पदाधिकाऱ्यांना खरमरीत पत्र

**पुणे | प्रतिनिधी**

दीनानाथ मंगेशकर रुग्णालय प्रकरणी भाजपच्या खासदार मेधा कुलकर्णी यांनी भाजपच्या पदाधिकाऱ्यांचे चांगलेच कान टोचले आहेत. 'सोम्या, गोम्या' असा उल्लेख करत कायदा हातात घेतल्याचे म्हणत थेट भाजप पदाधिकाऱ्यांना फैलावर घेतले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही दावखान्याची तोडफोड केल्याप्रकरणी हे योग्य नसल्याचे म्हटले होते.



मेधा कुलकर्णी यांनी दोन पानांचे पत्र रविवारी (ता. ६) भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटे यांना पाठवले आहे. त्यामध्ये कुलकर्णी म्हणातात, 'कुठल्यातरी सोम्या गोम्या, अर्ध्या हळकुंडाने पिवळ्या झालेल्या कार्यकर्त्यांनी कायदा हातात घेऊन करण्याचे काम नाही. शिवाय डॉक्टर सुश्रुत घैसास यांच्या वडिलांच्या हॉस्पिटलचा या घटनेची काही संबंध नसताना केलेले हे मोडतोडीचे व उर्मट कृत्य अनेकांच्या जिव्हारी लागले आहे. तोडफोड करणे हे भाजपाच्या पुणे महिला मोर्चा अध्यक्ष हर्षदा फरांदे व इतर पदाधिकाऱ्यांना निश्चितच शोभले नाही.'

दरम्यान, समाज माध्यमाद्वारे आमदार चित्रा वाघ यांनी भाजपच्या महिला पदाधिकाऱ्यांचे कौतुक केले होते. त्यानंतर खासदार मेधा कुलकर्णी यांच्या पत्राने भाजपला घरचाच आहेर दिला असल्याचे बोलले जात आहे. त्या पत्रात म्हणतात, दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाचा किती दोष आहे याची माहिती करून न घेता भाजपच्या महिला मोर्चाच्या सदस्यांनी उन्मादात जे वर्तन केले त्याबद्दल सर्वसामान्यांमध्ये प्रचंड रोष आहे. इतरही पक्षाच्या कार्यकर्त्यांनी जी विधाने केली त्याविषयी मी आत्ता बोलत नाही कारण तो आपला विषय नाही. शिवाय आपल्या मतदारांची आपल्या पक्षाप्रति निष्ठा आहे, प्रेम आहे व आशीर्वाद आहे. डॉक्टर सुश्रुत घैसास यांच्या वडिलांच्या क्लिनिकमध्ये जाऊन तोडफोड करणे हे भाजपाच्या पुणे महिला मोर्चा अध्यक्ष हर्षदा फरांदे व इतर पदाधिकाऱ्यांना निश्चितच शोभले नाही. आंदोलन करण्याच्या इतर सभ्य पद्धती आहेत, ज्याचा अवलंब करणे विचारधारेला धरून ठरेल असे मला वाटते.

अनुभव नसल्याने चूक होऊ शकते.

राजकीय व्यक्तींनी कायम कृतीला विचारांची जोड देऊन कार्य करणे आवश्यक असते. सवंग प्रसिद्धीच्या मागे लागून पुढे जाण्याचे किंवा इतरही अनेक सोपे मार्ग निवडण्याचे मोह कार्यकर्त्यांनी टाळले पाहिजेत. हे समजावून सांगण्याचे कार्य पुणे शहराचे अध्यक्ष या नात्याने आपण कराल व महिला मोर्चा पदाधिकाऱ्यांना समज देऊन त्यांना आपल्या पदाचा समजदारपणे व विनम्रतेने वापर करण्यास सांगाल अशी आशा करते. नुकसान भरपाई व दिलगिरी याची जोड दिल्यास पदाची व पक्षाची गरिमा वाढेल असेही मला वाटते. अनुभव नसल्याने चूक होऊ शकते पण लक्षात आल्यावर दुरुस्त करणे हे आवश्यक आहे, असेही कुलकर्णी यांनी पत्रात नमूद केले आहे.

# नाना पेठेतील लाकडी वाड्याला भीषण आग

पुणे: शहरातील मध्यवर्ती भागातील नाना पेठेत राम मंदिराच्या बाजूला असलेल्या एका जुन्या लाकडी वाड्याला भीषण आग लागल्याची घटना समोर आली आहे. आगीने काही वेळातच रौद्र रूप धारण केले, परंतु अग्निशमन दलाच्या तत्काळ प्रयत्नांमुळे सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.



अग्निशमन दलाच्या मुख्य केंद्राला रात्री आठच्या सुमारास नाना पेठेत राम मंदिराशेजारी असलेल्या मोठ्या लाकडी वाड्याला आग लागल्याची माहिती मिळाली. माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या पाच गाड्या तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. तोपर्यंत आगीने मोठे स्वरूप घेतले होते. परिस्थितीची गंभीरता लक्षात घेऊन अग्निशमन दलाने तातडीने आणखी मदत मागवली.

दहा फायर टेंडर आणि चार पाण्याच्या टँकरच्या साहाय्याने अग्निशमन जवानांनी वाड्याला चोहोबाजूंनी पाण्याचा मारा करत आग विझवण्याचे प्रयत्न सुरू केले. सुमारे एक तासाच्या अथक प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले.

रामनवमी असल्याने शहराच्या मध्यवर्ती भागात मिरवणुका काढण्यात आल्या होत्या. त्यामुळे दुपारपासूनच या भागात मोठी गर्दी होती. त्यातच आगीची घटना घडल्याने परिसरात एकच धावपळ उडाली. मध्यवर्ती भागातील अरुंद रस्ते आणि रस्त्यावर मोठ्या प्रमाणात असलेली गर्दी यामुळे अग्निशमन दलाच्या गाड्यांना घटनास्थळी पोहोचण्यासाठी आणि आग विझवण्यासाठी अडचणी आल्या. मात्र, जवानांनी शर्तीचे प्रयत्न करत काही वेळात आगीवर नियंत्रण मिळवले.

आगीच्या घटनेमागील नेमके कारण अद्याप समजू शकलेले नाही, असे अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

# अजित दादांचा काकांना चिमटा, संजय राऊतांचं लगेच प्रत्युत्तर; म्हणाले, शरद पवारांना चिमटा काढणं त्यांना परवडणारं नाही

बारामती: राज्यात आगामी स्थानिक स्वराज्य निवडणुकांच्या मोर्चेबांधणीत हळूहळू राजकीय घडामोडींना वेग येऊ लागलाय. बारामतीत जेवढं मी काम केलं तेवढं काम करणारा एकही आमदार बारामतीकरांना मिळणार नाही. १९५२ पासून जे जे आमदार झाले त्या आमदारांनी काय काम केलं ते एकदा बघा असं म्हणत बारामतीतल्या एका कार्यक्रमात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांना चिमटा काढलाय. इकडे काकांना टोला लगावताच तिकडे शिवसेनेचे खासदार संजय राऊतांनी शरद पवारांना चिमटा घेणं त्यांना परवडणार नाही असं लगेच प्रत्युत्तर दिलंय. दरम्यान, पुण्यातील वाढत्या गुन्हेगारीवर त्यांनी कारवाईचा इशारा दिलाय.मला काही लोकांचा फोन येतो की, दादा पोटात या, पोटात घ्या. अरे काय पोटात घ्या? पोट फुटायला लागलंय. ज्यांनी फोन केला त्यांना शरम कशी वाटत नाही, असं उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणालेत. त्याचीही सध्या चांगलीच चर्चा आहे.



अजितदादांचा काकांना चिमटा!म्हणाले..

बारामतीतल्या एका कार्यक्रमात बोलताना आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवारांना टोला लगावलाय.शरद पवार यांच्या पेक्षा बारामतीत सर्वाधिक विकास कामे आपण केली, असा दावा अजित पवार यांनी अप्रत्यक्षपणे केला आहे. यावेळी बोलताना त्यांनी पुण्यातील वाढत्या गुन्हेगारीवरही ते बोललेत. ते म्हणाले, मी जेवढं काम केलं असा आमदार मिळणार नाही असा माझा दावा आहे. तुम्ही आजवर बारामतीचं प्रतिनिधीत्व केलेले सगळे आमदार काढा. १९५२ पासून आतापर्यंत प्रत्येकाची कारकीर्द तपासा. प्रत्येकानं त्याच्या कारकीर्दीत काय केलंय. आता मी थांबणार नाही. तुम्ही लाखो मतांनी मला निवडून दिलंय.पुढची पाच वर्षे एवढी कामं करणार की आधीच्या कोणाच्याच कारकीर्दीत झालं नसेल एवढं या पाच वर्षात करणार असं आश्वासनही उपमुख्यमंत्री अजित पवारांनी दिलं.

१९५२ पासून आतापर्यंत जे आमदार झाले त्यांनी काय कामे केलं ते पाहा.. आणि मी केलेलं काम पाहा.. अजूनही काम करणार. उन्हात कार्यक्रम आहे.. सावलीत भाषण असतं तर बरं झालं असते. उन्हात भाषण करायचं बरं वाटत नाही. बीडीओ ना म्हटलेलं होतं सावलीत घ्यायचं ना. उन्हात तुम्ही तापत आहात तो ताप माझ्यावर निघाला तर अवघड व्हायचे. दरम्यान, यावर संजय राऊतांनी अजित पवारांना शरद पवारांना चिमटा काढणं परवडणार नाही असा टोलाही संजय राऊत यांनी लगावलाय

# हिंजवडीतील वाहतूक कोंडी लवकरच सुटणार

हिंजवडी : दररोज हिंजवडी परिसरात वाहतूक कोंडी होते. ही कोंडी फोडण्यासाठी प्रशासनाने पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. वाहतूक कोंडीची ठिकाणे शोधून त्यावर उपाययोजनाही करण्यात येणार आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) आयटी पार्कमधील उड्डाणपुलासह पर्यायी रस्त्यांच्या ६५० कोटी रुपयांच्या प्रकल्पांचे नियोजन केले आहे. या प्रकल्पांसाठी भूसंपादन करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यानंतर भूसंपादनास वेग येणार आहे. त्यामुळे भविष्यात आयटी पार्कमधील कोंडी सुटण्यास मदत होणार आहे.



हिंजवडी आयटी पार्कची उभारणी करताना तेथील वाहनांचा विचार करून रस्ते तयार केले होते. मात्र सध्या वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असून त्यामुळे वाहतूककोंडीची समस्या दिवसेंदिवस बिकट होत आहे. आयटी पार्कमध्ये वाहनांची संख्या गेल्या काही वर्षांत प्रचंड प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे सध्याचे रस्ते अपुरे पडू लागले आहेत. त्यातच या रस्त्यांना पर्यायी रस्ते करण्याकडे दुर्लक्ष झाल्याने वाहतूककोंडी ही नित्याचीच बाब आहे. त्यामुळे उड्डाणपुलासह नवीन पर्यायी रस्ते तयार केले जाणार आहेत. हिंजवडीतील लक्ष्मी चौकात सातत्याने वाहतूककोंडीचे होते. ही कोंडी सोडविण्यासाठी या चौकात उड्डाणपूल उभारण्यात येणार आहे. हा पूल चारपदरी आणि ७२० मीटर लांबीचा असेल. त्यासाठी ४० कोटी रुपयांचा खर्च होणार आहे. हिंजवडीतील शिवाजी चौक ते स्मशानभूमी या रस्त्याचे रुंदीकरण केले जाणार आहे. हा रस्ता ९०० मीटर लांबीचा आहे. हा रस्ता सहापदरी केला जाणार आहे. यासाठी २४.७४ कोटी रुपये खर्च येणार आहे. याचबरोबर आयटी पार्कमधील टप्पा एकपासून टप्पा तीनला जोडणारा नवीन रस्ता बांधला जाणार आहे. हा रस्ता ५ किलोमीटर लांबीचा असेल आणि त्यासाठी ५८४.१४ कोटी रुपये खर्च येईल. या दोन्ही रस्त्यांच्या जागा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ताब्यात आहेत. याचबरोबर काही भूसंपादन करावे लागणार आहे.

पूर्वी सार्वजनिक बांधकाम विभाग ही जागा संपादित करून 'एमआयडीसी'ला देणार होता. परंतु, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत 'एमआयडीसी'नेच हे भूसंपादन करावे, असा निर्णय झाला. सार्वजनिक बांधकाम विभागाने आधी भूसंपादन करून नंतर ही जागा 'एमआयडीसी'ला हस्तांतरित करण्यात वेळ घालवू नये. थेट 'एमआयडीसी'नेच भूसंपादन करून रस्त्यांचे काम सुरू करावे, असे निर्देशही त्या वेळी देण्यात आले होते. यामुळे या प्रकल्पांचे भूसंपादन करण्यासाठी 'एमआयडीसी'कडून प्रशासकीय प्रक्रिया सुरू झाली आहे.

# नुकसान भरपाई न दिल्याच्या रागातून विद्यार्थ्याचे अपहरण; बारा तासात विद्यार्थ्याची सुटका

पुणे । प्रतिनिधी

थार गाडी घेऊन येत असताना हिंजवडी येथील एक्सविर्या सोसाएटी मधील वळणावर एका झाडाला सिद्धांतकडून थार गाडी धडकली. या अपघातात थार गाडीचे मोठे नुकसान झाले. यामध्ये शरण व सिध्दांत दोघेही किरकोळ जखमी झाले. त्यांनी अपघाताची माहिती भावेश चौधरी याला दिली. तसेच अपघातात झालेल्या नुकसानीचा खर्च देऊ, असे सांगून ते दोघेही गाडी त्यांच्या ताब्यात देऊन लोणी काळभोरला परत आले.



दरम्यान, भावेश चौधरी व त्याच्या साथीदार शनिवारी (ता. ५) रात्री एक वाजण्याच्या सुमारास युवराज सिंग यांच्या फ्लॅटवर आले. गाडीची नुकसान भरपाई न दिल्याच्या रागातून त्यांनी फ्लॅटचा दरवाजा तोडून घरात प्रवेश केला. तसेच शरण यास शिवीगाळ करुन लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यानंतर शरण याला बळजबरीने गाडीत बसवून त्याचे अपहरण केले.

पोलिसांनी १२ तासात शरण गौडा यांची सुखरूप सुटका करून आरोपींना बेड्या ठोकल्या. सदरची उल्लेखनीय कामगिरी लोणी काळभोर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक अनिल जाधव, सर्जेराव बोबडे, पूजा माळी, पोलीस हवालदार विलास शिंदे, पोलीस अंमलदार बाजीराव वीर, शैलेश कुदळे, राहुल कर्डिले व त्यांच्या सहकाऱ्यांनी केली आहे.

# पत्नीच्या मदतीने चोरी करणाऱ्या सराफाला अटक

पुणे: पत्नीच्या मदतीने चोरी करणार्या एका सराफाला वारजे माळवाडी पोलिसांनी अटक केली. संपूर्णानंद वर्मा (वय ४३, रा. बालाजी बिल्डिंग, नेहरूनगर, पिंपरी) असे या चोरट्याचे नाव आहे. वर्मा हा सोन्याचे दागिने घडविण्याचे काम करतो. काही काळ त्याने सराफी व्यवसायही केला होता. परंतु, तो काही चालला नाही.



पत्नीच्या मदतीने त्याने ही चोरी केल्याचे निष्पन्न झाले आहे. याबाबत ४० वर्षीय महिलेने वारजे माळवाडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादींचे अष्टविनायक चौक येथे भाजीपाला, बांगड्या व मसाल्याचे पदार्थ विक्रीचा व्यवसाय आहे. त्यांचा मुलगा २२ मार्चला मसाले आणण्यासाठी मार्केट यार्डला गेला होता. त्यामुळे सायंकाळी त्या दुकानात एकट्याच होत्या. त्यांनी पर्समध्ये सोन्याचे दागिने व २ लाख रुपये रोख रक्कम ठेवली होती.

दुकानात ग्राहकांची गर्दी झाली होती. शेजारील दुकानदार त्यांच्या मदतीला आले होते. या वेळी एक महिला बांगड्या पाहण्यासाठी काऊंटरवरुन आत आल्या. तिने बांगड्या पाहिल्या व सासूसाठी मोठ्या साइजच्या बांगड्या हव्या असे सांगितले. तेव्हा त्यांनी सासूला घेऊन या, असे सांगितले.

त्यावर तिने सासू कोठे आहे, ते पाहते, असे बोलून घाईघाईने निघून गेली. त्यानंतर त्या बांगड्यांचा बांधलेला गठ्ठा पुन्हा रॅकमध्ये ठेवण्यासाठी गेल्या असता त्यांची सोन्याचे दागिने असलेली पर्स आढळून आली नाही. २ लाख रुपये व सोन्याचे दागिने असा ४ लाख ५७ हजारांचा ऐवज चोरीला गेला होता. वर्मा हा सराफा व्यापारी असून, त्याने त्याच्या पत्नीसह हे कृत्य केल्याची माहिती पोलिसांनी दिली. वर्मा याच्याकडून २ लाख रुपये रोख, २५० ग्रॅम चांदीची लगड, ६७ ग्रॅम सोन्याची लगड असा एकूण ४ लाख २७ हजार रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. ही कामगिरी पोलिस उपायुक्त संभाजी कदम, सहायक पोलिस आयुक्त भाऊसाहेब पटारे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक काईंगडे, पोलिस निरीक्षक (गुन्हे) नीलेश बडाख, उपनिरीक्षक संजय नरळे, पोलिस अंमलदार अर्जुन पवार, संजीव कळंबे, अमित शेलार, शरद पोळ, सागर कुंभार, बालाजी काटे, निखिल तांगडे, गोविंद कपाटे, अमित जाधव, योगेश वाघ, ज्ञानेश्वर चित्ते आणि गणेश शिंदे यांनी केली.

# जलशुद्धीकरण प्रकल्प की कचरा डेपो? आमदार माऊली कटके यांचा संतप्त सवाल

**शिरूर | प्रतिनिधी**

**शिरूर नगर परिषदेचा जलशुद्धीकरण प्रकल्प जो नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. सध्या तो प्रचंड दुर्दशेला सामोरा जात आहे. स्वच्छतेचा अभाव, देखरेखीची कमी आणि यंत्रणांची मोडतोड यामुळे संपूर्ण केंद्रच कचऱ्याच्या ढिगाऱ्यात बदलले आहे. याच पार्श्वभूमीवर आमदार ज्ञानेश्वर उर्फ माऊली आबा कटके यांनी अचानक दौरा करून केंद्राची पाहणी केली आणि प्रशासनाच्या हलगर्जी कारभारावर खरमरीत टीका केली.**



सिद्धीच्या पहाडाजवळ वसलेले हे जलशुद्धीकरण केंद्र सध्या भंगार आणि कचऱ्याच्या डेपोतच रूपांतरित झाले आहे. बांधकाम साहित्याचा राडारोडा, मोकळ्या क्लोरीनच्या गोण्या, आणि घोडनदीवरून येणाऱ्या पाण्याची दुर्गंधी यामुळे आमदार कटके संतप्त झाले. विशेष म्हणजे, पाहणीवेळी कोणताही जबाबदार अधिकारी केंद्रावर उपस्थित नव्हता. उपस्थित कर्मचाऱ्यांना प्रक्रियेची पुरेशी माहितीही नव्हती.

पाहणीनंतर आमदार कटके म्हणाले, इतक्या मोठ्या शहरासाठी लाखो रुपयांचा खर्च करून उभारलेली योजना जर नागरिकांना शुद्ध पाणी देण्यात अपयशी ठरत असेल, तर ती बंद करून दुसरा पर्याय शोधावा लागेल. पाहणीदरम्यान, नगर परिषदेच्या पाणीपुरवठा विभागातील लिपिक भूषण कडेकर यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली आणि सद्यस्थितीची माहिती दिली. आमदार कटके यांनी प्रकल्पाच्या सौंदर्यीकरणासाठी विशेष निधी मिळवण्याचे आश्वासन दिले. परिसराची तातडीने स्वच्छता करून हिरवळ विकसित करणे, जलशुद्धीकरण केंद्रातून बाहेर पडणाऱ्या पाण्याचा पुनर्वापर करून वनराई तयार करणे आणि यासाठी आराखडा सादर करण्याचे निर्देश त्यांनी नगर परिषदेला दिले.

१९८९ मध्ये उभारले गेलेले हे जलशुद्धीकरण केंद्र सध्या जुने झाल्यामुळे विविध दुरुस्ती कामे सुरू आहेत. मात्र त्यासोबतच नियमित देखभाल आणि स्वच्छतेकडे दुर्लक्ष झाल्याने प्रकल्पाची सद्यस्थिती चिंताजनक आहे. या पाहणी दौऱ्यात श्रीराम सेनेचे संस्थापक अध्यक्ष सुनिल जाधव, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहर अध्यक्ष एजाज बागवान, तसेच स्वप्नील रेड्डी, अतुल गव्हाणे, हर्षद ओस्तवाल, वसीम शहा आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# इलेक्ट्रिशियनच्या फुफ्फुसात पाच स्क्रू

पिंपरी : ॲल्युमिनियमचे पत्रे बसवत असताना, उघड्या विद्युत तारेला पाय लागून १९ वर्षीय इलेक्ट्रिशियनला जोरदार शॉक बसला. त्यामुळे खाली पडून बेशुद्ध झाल्याने त्याने तोंडात धरलेले पाच स्क्रू फुफ्फुसात गेले आणि दोन स्क्रू त्याने गिळले. फुफ्फुसातील पाच स्क्रू फ्लेक्सिबल ब-ॉन्कोस्कोपीद्वारे काढण्यात आले. तर, पोटात गेलेले दोन स्क्रू ४८ तासांमध्ये शरीरातून नैसर्गिकरित्या बाहेर पडले. त्यामुळे रुग्णाचा जीव वाचू शकला.

पिंपरी येथील डीपीयू सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी ही दुर्मिळ वैद्यकीय घटना यशस्वीपणे हाताळली. रुग्णाच्या फुफ्फुसात अडकलेले पाच आणि गिळलेले दोन असे एकूण सात मेटल स्क्रू शरीराबाहेर काढण्यात डॉक्टरांना यश आले. संबंधित इलेक्ट्रिशियन एका ठिकाणी फॉल्स सीलिंगसाठी ॲल्युमिनियमचे पत्रे बसवत होता. त्या वेळी उघड्या विद्युत तारेला पाय लागून त्याला जोरदार शॉक बसला. त्यामुळे तो खाली पडला आणि काही काळ बेशुद्ध झाला. याच दरम्यान, त्याने कामादरम्यान तोंडात धरलेले पाच स्क्रू त्याच्या फुफ्फुसात गेले आणि दोन स्क्रू त्याने गिळले.

शुद्धीवर आल्यानंतर, त्याला २ ते ३ मिनिटे तीव- खोकला, छातीत वेदना आणि श्वास घेण्यास अडथळा जाणवू लागला. डॉक्टरांनी



तातडीने एक्स-रे काढल्यावर फुफ्फुसात पाच आणि पोटात दोन स्क्रू असल्याचे स्पष्ट झाले. सुदैवाने, स्क्रू मुळे श्वसननलिकेला गंभीर दुखापत झाली नव्हती.